विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष दुसरे | अंक सातवा

जुलै २०२२



## डॉ. भालचंद्र कांगो यांच्या हस्ते लक्षवेधी पुरस्कार वितरण



विशाल, विनोद, सम्यक, हर्षदकुमार व घनशाम (पुणे)



रुक्साना मुल्ला (लातूर)



श्रीनिवास शिंदे (नांदेड)


संजय शेंडे व अशोक खोरगडे (नागपूर)



मनोहर जायभाये व बीड जिल्ह्यातील कार्यकर्ते


राजेश देवरुखकर, सुरेखा भापकर, तृप्ती पाटील, उत्तम जोगदंड व ठाणे जिल्ह्यातील कार्यकर्ते



अशोक निकम, सुशिला मुंडे व मच्छिंद्रनाथ मुंडे (नवी मुंबई)



विजय परब, यश, प्रसाद व सचिन (मुंबई)

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

आम्ही वारस विवेकाचे

**वर्ष दुसरे । अंक सातवा**

**जुलै २०२२**

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| • **संपादकीय** | | २ |
| • **संवाद** | | |
| **धर्मांध कन्सेन्टचे मॅन्युफॅक्चरिंग आणि माध्यमसंस्कृती** | संध्या नरे–पवार | ३ |
| **प्रतिमांचा पूर आणि बधिरीकरण** | गणेश विसपुते | ६ |
| • **संतांचिये द्वारी** | | |
| **नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी** | बाळासो सुतार | १० |
| • **पुस्तक प्रकाशनाचा दिमाखदार सोहळा** | मच्छिंद्रनाथ मुंडे | १८ |
| • **समारंभ : पुरस्कार वितरणाचा** | उत्तम जोगदंड | १९ |
| • **जनप्रबोधन यात्रा : वारसा संतांचा अंधश्रद्धा निर्मूलनाचा** | मनोहर जयभाये | २१ |
| • **विस्तारित राज्य कार्यकारिणी वृत्तांत** | डॉ. ठकसेन गोराणे | २३ |
| • **अविनाशभाई : चळवळीचा रोडमॅप विस्तारणारा कार्यकर्ता व नेता** | कॉ. हर्षदकुमार मुंगे | २६ |
| • **माधव बावगे : साहसी आणि ध्येयनिष्ठ कार्यकर्ता** | डॉ. सोमनाथ रोडे | २८ |
| • **महाराष्ट्र अंनिसची खबरबात** | अनिल शोभना वसंत | ३० |

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

• **संपादक**
डॉ. नितीन शिंदे

• **कार्यकारी संपादक**
उत्तम जोगदंड

• **सहसंपादक**
डॉ. श्यामसुंदर मिरजकर

• **सदस्य**
डॉ. मांतेश हिरेमठ
डॉ. बाळू दुगडूमवार
प्रल्हाद मिस्त्री
डॉ. सुशिल मेश्राम

• **व्यवस्थापकीय संपादक**
अजय भालकर

• **सदस्य**
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे

• **सल्लागार मंडळ**
डॉ. प्रदीप पाटकर
संध्या नरे–पवार
किशोर बेडकिहाळ

**वार्षिक वर्गणी**

**४००** रु. (व्यक्तीसाठी) **५००** रु.(संस्थेसाठी)

• **वर्गणी पाठविण्याची सुविधा** :
महाराष्ट्र अंनिस अंतर्गत प्रकाशन संस्थेच्या खालील बँक खात्यावर वर्गणीची रक्कम पाठवू शकता.
**विवेक जागर संस्था,**
**आय.सी.आय.सी.आय. बँक, मुंदडा मार्केट, धुळे**
**खाते नंबर** : 646301002757
IFSC Code : ICIC0006463

• वर्गणीची रक्कम ऑनलाईन पाठविल्याचा स्क्रीनशॉट अजय भालकर ९३५९०८०८२० या व्हॉटस्ॲप नंबरवर पाठवावा. लगतच्या अंकासोबत वर्गणीची पावती पाठविली जाईल.

**मुखपृष्ठ** : सचिन भोसले

**स्वागतमूल्य : ₹ २५/-**

सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापले आणि प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर (जिल्हा सांगली) ४१५ ४०९ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

संपादकीय

## आक्रमक धर्मवादाच्या बुलडोझरने लोकशाहीची पडझड

धर्म हा मूलतः सद्भाव, सदाचार, शांततापूर्ण निरामय सहजीवन आणि चराचरांबद्दलचा मैत्रभाव यासाठी असतो. धर्मात कर्मकांड शिरले की, अनिष्ट रूढी सुरू होतात. पुरोहित वर्गाचे वर्चस्व वाढले की, अंधश्रद्धा बोकाळतात आणि शारीरिक – मानसिक – आर्थिक पातळ्यांवर शोषण सुरू होते. जेव्हा धर्म आक्रमकपणे मांडला जातो, तेव्हा धर्मकेंद्री राजकारणाला सुरुवात होते. अशा धर्मकेंद्री राजकारणात तीन समाजघटक अग्रभागी असतात. ते म्हणजे धर्मगुरू, भांडवलदार व राजकारणी! या तिघांची स्वार्थमूलक अभद्र युती राष्ट्रात विषमता व अंतर्गत यादवीचे वातावरण निर्माण करते. त्यातून भौतिक प्रगतीचा आभास आणि मूल्यात्मक पडझडीचा कालखंड सुरू होतो.

देशातील आजची धार्मिक व राजकीय स्थिती चिंताजनक आहे. बहुसांस्कृतिकता, विविधतेत एकता हे भारताचे खास वैशिष्ट्य! परंतु दूरदर्शनच्या वाहिन्यांवरून चालणाऱ्या बातम्या, महाचर्चा या विचारमंथन न घडविता नुसताच गदारोळ माजवतात, असेच दिसते. एका राष्ट्रीय पक्षाच्या महिला प्रवक्त्यांनी प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या वैवाहिक व कौटुंबिक जीवनावर अनुदार टिपणी केली. याच पक्षाच्या दुसऱ्या प्रवक्त्यांनी ट्विटरद्वारे या विधानाचे समर्थन केले. या अनुदार उद्गाराबद्दल समाजातील विवेकी व्यक्ती व संघटनांनी केंद्र सरकारकडे तक्रारी केल्या. परंतु त्याकडे नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केले गेले. नंतर कतार, संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया अशा अनेक आखाती देशांनी परराष्ट्र मंत्रालयाकडे तक्रारी दाखल केल्या. भारताने माफी मागावी, अशी मागणी केली. शेवटी या पक्षाने त्या दोघांना पक्ष प्रवक्ते पदावरून हटवले. एका राजकीय पक्षाच्या प्रवक्त्यांच्या बेताल वक्तव्यामुळे भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर नमते घेण्याची वेळ आली.

दुसऱ्या बाजूला प्रयागराज (उत्तर प्रदेश) येथे या वक्तव्याविरुद्ध जोरदार निदर्शने झाली. त्यामध्ये जाळपोळ व नासधूसही केली गेली. तेथील प्रशासनाने या हिंसाचारासाठी जबाबदार ठरवून मुस्लीम धर्मीय संशयित आरोपींच्या घरावर बुलडोझर, जेसीबी चालवून ते जमीनदोस्त केले. यासाठी 'बेकायदा बांधकाम' असे कारण पुढे केले गेले. सुप्रीम कोर्टाने यावर 'असमर्थनीय कारवाई' अशी टिप्पणी केली आहे. निदर्शनाच्या दरम्यान होणारा हिंसाचार व जाळपोळ याचे कोणीही समर्थन करू शकत नाही. पण म्हणून प्रशासनाने कायदा हातात घेणे योग्य ठरेल का? गुन्हा सिद्ध होण्यापूर्वीच कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन कुणाची घरे पाडणे समर्थनीय ठरेल का? याचाही आपण विचार करायला हवा. गुन्हेगार कुणीही असला, तरी कायद्याच्या चौकटीतच त्याला शिक्षा व्हायला हवी.

आजचे असंवैधानिक, धर्मकेंद्री राजकारण भविष्यात जटील व गुंतागुंतीचे प्रश्न उभे करेल. कारण धर्मकेंद्री राजकारण विविध समुदायांना युद्धस्थ प्रतिस्पर्धी म्हणून परस्परांसमोर उभे करते. त्यातून अविश्वासाचे व अशांततेचे वातावरण निर्माण होते. जे राष्ट्रनिर्मितीस बाधक ठरते. अशा वातावरणाचा परिणाम म्हणून तरुण पिढी संकुचित व पूर्वग्रहदूषित विचारसरणीची बनते. भारतीय राष्ट्रनिर्मात्यांनी पाहिलेले विवेकी बुद्धिप्रामाण्यवादी लोकशाही राष्ट्रनिर्माणाचे स्वप्न साकार करण्यासाठी आपणास हे आक्रमक धर्मवादी राजकारण नाकारावे लागेल. घटनेने दिलेले धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य हे लोकशाही व्यवस्था कायम राखण्याच्या अटीवर आहे, हे विसरता येणार नाही. म्हणूनच आपणास विवेकाचा आवाज अधिकाधिक बुलंद करावा लागेल! समाजाच्या सर्व स्तरांत पोहोचवावा लागेल. या कठीण राष्ट्रीय कार्यासाठी आपण तयार असले पाहिजे.

जय संविधान! जय भारत!!

**– संपादक मंडळ**



# धर्मांध कन्सेन्टचे मॅन्युफॅक्चरिंग आणि माध्यमसंस्कृती

संध्या नरे-पवार
७५०६६०३०३८

मी माध्यमकर्मी आहे. त्यामुळे सुरुवात माध्यमांपासून करते. संपूर्ण आसमंतात एक वैचारिक कोलाहल आहे. विविध विचारांचे टकराव आहेत, संस्कृतींचे संघर्ष आहेत. वास्तवाचे अनेक तुकडे सभोवताली आहेत. वातावरणात एक तीव्रता आहे. समाजाचे मानस रोजच्या रोज उलटेपालटे होत आहे. काहीच एकसंध नाही, सगळंच खंडित आहे. धर्म, जात, भाषा, वर्ण, लिंग या परंपरागत विभाजकांच्या बरोबरीनेच नागरिकत्व, राष्ट्रवाद, देशप्रेम या गोष्टीही आता विभाजनासाठी वापरल्या जात आहेत. सांस्कृतिक संघर्ष अत्यंत टोकदार बनला असून झुंडबळींच्या रूपाने व्यक्त होत आहे. विद्यापीठांच्या आवारांमध्ये या वैचारिक, सांस्कृतिक संघर्षाची कुस्ती खेळली जात आहे. प्रशासकीय यंत्रणा सोबतीला घेतली जात आहे. विरोधकांची, विद्यार्थ्यांची डोकी फोडली जात आहेत. एकूण वातावरण 'गोली मार भेजे में, भेजा शोर करता है' असे आहे. मान्य नसलेल्या विचारांची थेट हत्या केली जात आहे. या अशा स्थितीत ज्यांनी विचारांना दिशा द्यावी, अशी अपेक्षा असते ती माध्यमं काही अपवाद वगळता आपली वैचारिक प्रस्तुतताच हरवून बसली आहेत. एकूण एककल्ली वातावरणात माध्यमंही एककल्ली बनली आहेत. आज माध्यमांचा आवाका आणि पसारा वाढला आहे. लोकांच्या संपूर्ण जगण्याला माध्यमांनी वेढले आहे. मोबाईलमधून रात्री झोपतानाही सगळी माध्यमं लोकांच्या उशाशी असताना माध्यमांना आपल्या वैचारिक भूमिकेचे विस्मरण होणे आणि धर्म, जात, वर्ग, लिंग, भाषा यांच्याबरोबरीने माध्यमांनीही एक विभाजक बनणे, ही बाब अतिशय घातक आहे. शोषित, पीडितांच्या, शूद्र-अतिशूद्रांच्या दुःखाविरोधात व्यक्त होणारे बाबासाहेबांचे 'मूकनायक' हे एक टोक मानले तर आजची माध्यमे ही पार दुसऱ्या टोकाला उभी आहेत आणि हे कडेलोटाचे टोक आहे.

संख्येच्या दृष्टीने पाहाता माध्यमांची व्याप्ती वाढत आहे. एका परीने माध्यमांचे लोकशाहीकरण होत आहे. समाजमाध्यमांवर आज वेगवगेळ्या पोर्टलच्या, मीम्सच्या माध्यमातून सर्वसामान्यही व्यक्त होऊ शकतात. पण त्याचवेळी आशयाच्या दृष्टीने पाहाता त्यातला कट्टरतावाद वाढत चालला आहे. माध्यमं झुंडशाहीची वाहक बनत आहेत.

एकूणच माध्यम-संस्कृतीविषयी बोलताना आपल्याला ग्रामशी या नवमार्क्सवादी विचारवंताची मांडणी लक्षात घ्यायला हवी. अभिजन विचारसरणीच्या प्रभुत्वाची संकल्पना मांडताना माध्यमं याकामी महत्त्वाची भूमिका पार पाडतात, याकडे ग्रामशी लक्ष वेधतो. समाजातले अभिजन विचारसरणीचे प्रभुत्व (हेगिमनी) केवळ बळजबरीने किंवा हिंसेच्या माध्यमातून (कोअर्सिव्ह ॲपरॅटस्) प्रस्थापित होत नाही, तर सामाजिक चलनवलनातल्या प्रभावी हस्तक्षेपाने, काही वाटाघाटींमधून हे प्रभुत्व कायम राखले जाते. आधुनिक काळात ही हस्तक्षेपाची, निगोशिएशन्सची प्रक्रिया माध्यमं पार पाडतात, असे ग्रामशी यांचे प्रतिपादन आहे. भारतासारख्या ब्राह्मणी वर्चस्वाच्या नीतीमूल्यांवर आधारित जात, वर्ण, वर्ग वर्चस्ववादी समाजव्यवस्थेत हे वर्चस्व कायम राखण्याचं काम पर्यायी माध्यमं सोडता मुख्य प्रवाहातील भांडवली माध्यमं कायम करत आलेली आहेत. मात्र आज या प्रक्रियेने अधिक वेग घेतला आहे. माध्यमांचा हस्तक्षेप अधिक चिथावणीखोर झाला आहे.

अलीकडच्या काळात हर्मन आणि नोआम चोम्स्की या पाश्चात्त्य अभ्यासकांनी 'मॅन्युफॅक्चरिंग कन्सेन्ट' म्हणजेच 'सहमतीचं उत्पादन' ही संकल्पना माध्यमांच्या संदर्भात वापरली आहे. त्यांनी ही संकल्पना प्रामुख्याने राजसत्ता आणि भांडवलशाहीच्या संदर्भात वापरली आहे. लोकशाही व्यवस्थेत सहमतीचं उत्पादन ही आता एक नवी कला झाली आहे. नव्वदीच्या दशकानंतर खासगीकरण, जागतिकीकरण, बाजारकेंद्री भांडवलशाही यांचं पर्व सुरू झाल्यावर समाजात कन्झ्युमरिझम-

चंगळवाद रुजविण्यासाठी भांडवलशाहीने माध्यमांना हाताशी धरले. तीव्र होत जाणाऱ्या विषमतेच्या पायावरच चंगळतावादाचे चकाकते इमले उभे असतात. चंगळतावादाचे इमले चढवत न्यायचे तर उपभोक्तावादी संस्कृती समाजात रुजवायला हवी. तिला पोषक ठरतील, असे आचारविचार समाजात रुजवायला हवे. लोकांची सहमती निर्माण करायला हवी.

मग वर्तमानपत्रेच सौंदर्यस्पर्धा आयोजित करू लागली, नवरात्रीत साड्यांचे नवरंग उधळू लागली. खासगी महागडं शिक्षण हे एक उत्पादन आहे. ते विकण्यासाठी माध्यमांमध्ये करियर गायडन्सवर सदरं सुरू झाली. तज्ज्ञांचे मार्गदर्शन सुरू झाले. स्त्रिया या चंगळवादी संस्कृतीच्या मुख्य ग्राहक आहेत. साहाजिकच स्त्रियांसाठी वेगळ्या पुरवण्या सुरू झाल्या. माध्यमांमध्ये स्त्रियांची एक वेगळी उपसंस्कृती निर्माण करण्यात आली. छापील माध्यमापासून ते इलेक्ट्रॉनिक माध्यमांपर्यंतची विविध माध्यमं स्वतःला आधुनिक, उदारमतवादी म्हणवत असली, तरी प्रत्यक्षात त्यांची धर्मसंस्था, राजसत्ता आणि अर्थव्यवस्था या त्रयीशी हातमिळवणी असते. धर्मसंस्था, राज्यसंस्था आणि भांडवली अर्थव्यवस्था हे तिन्ही घटक पुरुषप्रधान असल्याने या तीन घटकांच्या आधारे कार्यरत असणारी माध्यमेही पुरुषप्रधानतेच्या साच्यातच स्वतः घडतात आणि पुन्हा पुरुषप्रधानतेचा साचा नव्याने घडवतात. यातूनच कधी जाणीवपूर्वक तर कधी त्यांच्याही नकळत माध्यमं सार्वजनिक पितृसत्तेची भूमिका पार पाडतात. साचेबद्ध स्त्रीप्रतिमांची निर्मिती केली जाते. चौकटीतल्या स्त्रिया आदर्श ठरतात, तर चौकटीबाहेर पाऊल टाकणाऱ्या स्त्रिया स्वैराचारी ठरतात. आज माध्यमांमध्ये ज्या पद्धतीने स्त्रियांचे चित्रण येत आहे. तसेच माध्यमांच्या प्रभावाखाली असणाऱ्या मध्यमवर्गीय उच्चजातीय स्त्रिया ज्याप्रमाणे धर्मांधतेचे, कट्टरतावादाचे समर्थन करत आहेत, त्यामागे हीच रचना कारणीभूत आहे.

नव्वदीनंतर बाजारकेंद्री भांडवलशाहीचे हितसंबंध जपत माध्यमांनी सहमतीचे भरघोस पीक काढले. २०१४ नंतर यात थोडा बदल झाला. सत्ताधारी असलेल्या धर्मांध कट्टरतेशी माध्यमांची मालकी असलेल्या भांडवलदारांनी हातमिळवणी केली. तसेच सत्तेच्या मर्जीतल्या भांडवलदारांनी माध्यमांची खरेदी केली. सत्तेच्या मर्जीतली माणसं संपादकपदावर बसविण्यात आली. यानंतर आता माध्यमांनी मोठ्या प्रमाणात धर्मांधतेच्या सहमतीचं उत्पादन घ्यायला सुरुवात केली आहे. सर्वसामान्य वाचक, प्रेक्षक धर्मांधतेच्या विविध पैलूंशी सहमती दाखवू लागला आहे. 'लव्ह जिहाद' ते 'काश्मीर फाईल्स' असा हा व्यापक विस्तार आहे.

जागतिक इतिहास हा वर्ग संघर्षांचा इतिहास आहे आणि त्यात उत्पादन साधनांची मालकी महत्त्वाची भूमिका पार पाडते, असे कार्ल मार्क्स यांनी सांगितलेले आहे. माध्यमही सहमतीचे उत्पादन काढत असल्याने तीही उत्पादन साधनं बनली आहेत आणि ही अशी उत्पादन साधनं जेव्हा सत्ताधारी कट्टरतेशी, धर्मांधतेशी हातमिळवणी केलेल्या भांडवलदारांच्या ताब्यात असतात, तेव्हा माध्यमं ही प्रबोधनाचे किंवा मनोरंजनाचे केंद्र न राहाता त्यांच्या मालकांच्या हातातले शस्त्र बनतात. आज सत्तेच्या विरोधात बोलणाऱ्यांवर, अल्पसंख्यांक समुदायांवर हे शस्त्र रोखलेले आहे.

**स्मृतींचे खच्चीकरण, मिथ्या स्मृती आणि तर्कविसंगत मिथ्यासमर्थन**

२०१४ ला २००२ ची पार्श्वभूमी आहे. २००२ ला १९९२ ची पार्श्वभूमी आहे, तर १९९२ ला १९२५ ची पार्श्वभूमी आहे आणि १९२५ ला पार ऋग्वेद काळातल्या पुरुषसुक्ताची पार्श्वभूमी आहे. पण सध्या असा सलग विचार करणं एकूणच कठीण झालं आहे. कारण वर्तमान अतिशय वेगाने वाकडातिकडा, उभा-आडवा फिरतोय. सभोवतालचा कोलाहल इतका वाढला आहे की, एक सलग संगती लावणं अशक्य बनत आहे. एका पाठोपाठ एक घटना घडत आहेत. प्रत्येक घटना अधिकाधिक विखार घेऊन समोर येतेय. सामाजिक आणि राजकीय वातावरण असे आहे की, बुद्धीचा, विवेकाचा, समतावादी विचारांचा खून पडला तरी चालेल; पण आमच्या भावना, आमचा वृथा धर्माभिमान, आमचा जाती अहंकार दुखावता कामा नये. तो दुखावला तर सनातनी, कर्मठ विचाराचे विविध गट आक्रमणाला तयार आहेत. मानवी मूल्यांची पाठराखण करणारे, राज्यघटनेच्या चौकटीतले तुमचे एखादे विधान कधीही, केव्हाही धर्मविरोधी, राष्ट्रविरोधी बनते आणि तुम्ही आरोपीच्या पिंजऱ्यात ढकलले जाता. या अशा वेळी राज्यसंस्था नामक यंत्रणा अदृश्य असते.

समाजातील कट्टर धार्मिकता, सनातनी विचारांचा प्रभाव यामुळे स्त्रिया, अल्पसंख्यांक समुदाय आणि इतर शोषित जन यांच्यावरचे अत्याचार वाढत आहेत. स्त्रियांचा पेहराव, त्यांचं वागणं, बोलणं, त्यांचा प्रेमात पडण्याचा, जोडीदार निवडीचा अधिकार या साऱ्यावर बंधनं येताहेत. मांसाहार करायचा की नाही, करायचा असेल, तर कुठे करायचा? केव्हा करायचा? याचे निकष ठरवले जात आहेत. या विरोधात वागणाऱ्यांची डोकी फोडली जात आहेत. गोमांस बाळगल्याच्या संशयावरून एखाद्याला झुंडीने संपवले जात आहे, लिंचिंग केले जात आहे. रहिवाशी संकुलांमध्ये अल्पसंख्यांकांना आणि मांसाहार करणाऱ्यांना जागा नाही, हे अर्थसत्तेच्या बळावर न बोलता सांगितले जात आहे. समाजाचे घेट्टॉयझेशन (Ghettoization) केले जात आहे. धर्मांतर करण्याचा राज्यघटनेने दिलेला अधिकार नाकारून धर्मांतरबंदीच्या कायद्याची मागणी केली जात आहे, काही राज्यांमध्ये तो केलाही जात आहे. आंतरधर्मीय लग्नांना 'लव जिहाद' ठरवले जात आहे. नागरिकत्वाच्या अधिकारांचा संकोच करून देशांतर्गत वसाहतवाद लादण्याचा प्रयत्न केला जात आहे. नागरिकांवरचा सर्व्हेलन्स, टेहळणी वाढली आहे. अगदी सहजतेने कोणावरही देशद्रोहाचा गुन्हा दाखल होतोय किंवा त्याला-तिला देशद्रोही असे संबोधले जात आहे. अतिशय असभ्य भाषेत महिलांना, तरुणींना ट्रोल केले जात आहे. बलात्काराच्या धमक्या दिल्या जात आहेत. सुल्ली ॲप्सवरून अल्पसंख्यांक महिलांची आभासी विक्री केली जात आहे. कोविडच्या काळातही सगळे नियम बाजूला सारून कुंभमेळा पार पाडला जातो; पण त्याचवेळी भोंगाविरुद्ध हनुमान चालिसा असं द्वैत निर्माण करून धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा नवा प्रयोग केला जात आहे.

एक घटना घडते, आपण त्यावर काही विचार करू लागतो, त्याचा अन्वयार्थ लावू पाहातो तोवर दुसरी घटना घडते, तिच्यातून सावरेपर्यंत तिसरी. उत्तर आधुनिक काळात एकूणच जगण्याला वेग आलेला आहे. सामान्य माणूस त्या वेगाशी आपल्या जगण्याची गती जुळवत असतानाच कट्टरतावाद्यांकडून एका पाठोपाठ एक अशा दुहीची पेरणी करणाऱ्या घटना घडवून आणल्या जात आहेत. 'नकाब का शिक्षण' हा वाद संपत नाही तोच 'रामनवमी आणि मांसाहार' हा वाद पुढे आणला जातो, तो संपायच्या आधीच 'भोंगे का हनुमान चालिसा' हा प्रश्न उच्चरवात विचारला जातो. एक घटना मनात रुजायच्या आधीच दुसरी घडतेय. तुमच्या स्मृतीत कुठचीच गोष्ट टिकू दिली जात नाही. अखलाखच्या झुंडबळीची घटना कधीतरी खूप मागे घडल्यासारखी वाटते. मुजफ्फरनगरची दंगल स्मृतीपटलावर अंधूक झाली आहे किंवा काहींच्या बाबतीत ती पुसली गेली आहे. ग्रॅहम स्टेन्सला त्याच्या दोन मुलांसह जिवंत जाळणारा दारासिंग तर आज कोणाच्या लक्षातही नाही. हे एक प्रकारे स्मृतींचं खच्चीकरण आहे. सलग अशी कोणतीच स्मृती उरणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. विलक्षण अशी मानसिक, भावनिक अस्थिरता निर्माण केली जात आहे. अगदी एका वाक्यात सांगायचे तर प्रतिपक्षाची दमछाक केली जात आहे. मग स्मृती उरल्याच तर त्या तुकड्यातुकड्याने उरतात. सामान्यजनांना त्यांची एकत्र संगती लावणे अशक्य होते. स्मृती आठवल्याच तर त्या निर्जीव चित्रासारख्या आठवतात. त्यातला जिवंतपणा, त्यातले राग-लोभ, क्रिया-प्रतिक्रिया संपलेल्या असतात. ग्रॅहम स्टेन्स आठवा किंवा अखलाख आठवा, त्यावेळी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी, संबंधित एखादा फोटो नजरेसमोर येईल. बाकी फारसे तरंग मनात उमटणार नाहीत. स्मृती आहेही आणि नाहीही, ही अशी अवस्था म्हणजे स्मृतींचं खच्चीकरण आहे, असे मला वाटते.

खऱ्या स्मृतींच्या खच्चीकरणाबरोबरच खोट्या स्मृती रुजवण्याचं कामही मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यातून संपूर्ण समूहाची मिळून एक 'मिथ्यास्मृती' तयार केली जाते. त्यासाठी भाषेचाही अचूक वापर केला जातो, भाषिक राजकारण खेळले जाते. उदा. आर्यांचे आगमन आणि मुस्लिमांचे आक्रमण. आगमन आणि आक्रमण या दोन शब्दांमधून जे सूचित होते ते असे की, आर्यांचे जे काही स्थलांतर झाले, ते निःशस्त्र, अगदी शांततामय मिरवणूक काढून झाले आणि मुस्लीम आले ते तलवारी परजत आले. यातून तलवारीच्या जोरावर मुस्लीम राजांनी, सरदारांनी धर्मांतरं केली, अशी एक मिथ्या स्मृती तयार केली जाते. मुळात भारतात इस्लाम आला दक्षिण भारतात, तो अरब व्यापाऱ्यांच्या माध्यमातून आणि नंतर सूफी संतांच्या माध्यमातून. मुस्लीम राजवटीत काही ठिकाणी जबरदस्तीने धर्मांतर झाली असतील. पण खरंच सरसकट तलवारीच्या जोरावर धर्मांतरं झाली असती, तर स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशातल्या हिंदूंची संख्या पन्नास टक्क्यांहून कमी असायला हवी होती.

**(पृष्ठ क्र. १३ पहा)**



# प्रतिमांचा पूर आणि बधिरीकरण

गणेश विसपुते
९८९००६१४२१

प्रतिमांचं नवंच युग आहे. सगळीकडे प्रतिमांचे आरसे तुम्हाला टिपायलाही टपलेले आहेत. आरोग्यासाठीचं ॲप, स्विगीसाठीचं, झोमॅटोसाठीचं, अमुकसाठीचं ॲप, तमुकसाठीचं ॲप, तुमचं क्रेडिट कार्ड, तुमचा फोन या सगळ्यांतून एक अदृश्य डोळा पाहातोय तुमच्या इतिहास–वर्तमानाचा, तुमच्या जन्म–मरणाचा एक्स रे विनासायास. सामाजिक माध्यमांतलं व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य वगैरे ऐकून सत्ताविसाव्या मजल्यावर राहाणारा गबदूल माणूस हसतो आणि ती माध्यमं विकत घेतल्याचा कागद लॉकरमध्ये ठेवून देतो. ज्यां बॉद्रिला नावाचा एक फ्रेंच समाजशास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ होता, त्यानं आजच्या या मायावी जगाबद्दल लिहिताना असं म्हटलं आहे की, जे अदृश्य आहे त्याच्या अनिवार आकर्षणाशिवाय आपल्याकडे काहीही उरलेलं नाही आणि यामुळे आपल्या नजरेसमोर एक खोटी, काल्पनिक स्वायत्तता उभी राहाते. मासमीडिया मालकांनी समाजावर ताबा मिळवला आहे. माध्यमातून जे आभासी वास्तवाचं चित्र आपल्याला दिसतं, खोटे घडवून आणलेले लष्करी हल्ले असतील, धादांत असत्याची चित्रणं असतील, ह्या सगळ्याला विरोध करण्याची शक्यता नष्ट करण्यात येत आहेत. अतिप्रगत तंत्रज्ञानाच्या वास्तवातल्या वापरानं वास्तवाचा अर्थच बदलून जातोय. अनेक गोष्टींमधले अर्थच हरवून टाकण्याची कारस्थानं रोज अंमलात येत आहेत. त्यातून येणाऱ्या अशा विषादानं आपण आज भिजलेलो आहोत.

'वन हन्ड्रेड इअर्स ऑव्ह सॉलिट्यूड' अर्थात् 'एकांतवासाची शंभर वर्षं' ही गॅब्रिअल गार्सिया मार्केझ यांची नोबेल पुरस्कारप्राप्त कादंबरी आहे. त्यातल्या चौदाव्या प्रकरणातला एक भाग अलीकडे मला पुन्हा पुन्हा आठवतो. जुझे अर्काडिओ सेगुन्दो ह्या नावाच्या कामगारानं केळीच्या बागांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना संघटित करून संप करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. सगळ्या म्हणजे तीन हजार कामगारांना वाटाघाटींसाठी मैदानावर बोलावलं जातं. मैदानावरच्या त्या जाहीर सभेत लेफ्टनंट इसाका हा सगळा संपच अवैध असल्याचं सांगून कामगारांनी तो पाच मिनिटात मागं घ्यावा, असं सांगितलं जातं. काही मिनिटांतच कामगारांवर मशिनगन्सच्या गोळ्यांचा वर्षाव होतो. तिथं म्हातारी माणसं असतात, लहानगी बाळं असतात, स्त्रिया असतात. लष्करी मशिनगन्स या जित्याजागत्या तीन हजार माणसांची चाळण करून त्यांना निर्जीव प्रेतांमध्ये बदलून टाकतात. अर्थातच मकॅन्डोत मार्शल लॉ जाहीर होतो. या नरसंहारानंतर काही काळानं सेगुन्दो डोळे उघडून पाहातो तेव्हा त्याला कळतं, की आपण प्रेतांनी खचाखच भरलेल्या लांबलचक आगगाडीत प्रेतांच्या ढिगाऱ्यावर अस्ताव्यस्त पडलेलो आहोत. त्याच्या लक्षात येतं, सडकी केळी जशी फेकली जातात तशीच आगगाडीतली ही हजारो प्रेतं थोडाच वेळात समुद्रात फेकली जाणार आहेत. जुझे अर्काडिओ कसाबसा ट्रेनवरून अंधारात उडी मारून निसटतो आणि जखमी अवस्थेत तिथून उलटा प्रवास करत पहाटे फटफटताना मकॅन्डोला पोहोचतो.

एक स्त्री त्याला भेटते. तिच्याशी तो झालेल्या नरसंहाराबद्दल तो बोलू पाहातो. तर असं काही इथं झालेलंच नाही, असं ती त्याला ऐकवते. तो लोकांशी बोलतो. प्रत्येक जण तेच सांगतो. मकॅन्डोत प्रत्येकाची स्मृती आणि मती हरवली आहे हे पाहून तो भयभीत होतो. सरकारी निवेदनातूनही हेच सांगितलं जातं, की इथं कुणीही मृत्यू पावलेलं नाहीय. सरकारी अधिकारी त्याला वेड्यात काढतात. तू नक्कीच स्वप्न पाहिलं असेल. मकॅन्डोत असं कधी झालेलं नाही आणि कधीही होणार नाही. इथे सगळे आनंदी आहेत. चांगले दिवस आलेले आहेत. मकॅन्डोवर सतत एक कंटाळवाणा पाऊस चिकचिकत पडत असतो. त्या पावसात नरसंहारात वाहिलेलं रक्त धुतलं जातं. मरून

पडलेली बायामाणसं जणू अदृश्यच होतात आणि त्यांच्याबद्दल कुणीही काही बोलत नाही. हे ऐकून तुम्हाला काही ओळखीचं आठवतंय?

मार्केझच्या कादंबरीतला हा भाग अलीकडे मला दुःस्वप्नासारखा सतत आठवतो. नव्हे, ती दुःस्वप्नं प्रत्यक्ष वास्तवात दिसू लागलेली आहेत. आपल्याकडेही, एवढं सगळं होवून मराठीतल्या एक प्रस्थापित लेखिका खुलेआम विचारतात, कुठे आहे या देशात हुकूमशाही? अभिव्यक्ती स्वातंत्र्याची कुठे आहे दडपशाही? तेव्हा माझ्यासारखा माणूस स्तब्ध होतो. लेखकपणाच्या प्राथमिक शर्तीचाच असा भंग झाल्याचं पाहून क्षोभ होतो. माझ्यासारखीच अवस्था सदैव जागा असलेल्या जयंत पवार या लेखक मित्राची झाली होती. 'मग ही कोणती शाही आहे, ते तरी सांगा', असं उद्विग्न होऊन त्यानं विचारलं होतं.

**अन्यत्व, असहमती आणि सहिष्णुता**

आपण इतका चिरफाळलेला, इतका असहिष्णू झालेला समाज नव्हतो. अलीकडेच रोमिला थापर यांच्या निबंधांचं एक पुस्तक प्रकाशित झालेलं आहेः व्हॉईसेस ऑफ डिसेंट. त्याचं मिलिंद चंपानेरकरांनी केलेलं 'असहमतीचे आवाज' या शीर्षकाचं मराठी भाषांतरही आता उपलब्ध आहे. त्यात थापर असं म्हणतात की, असहमती ही काही आधुनिक काळातली संकल्पना नाहीये, परंतु, असहमतीचे विविध आकृतीबंध ओळखणं, ही गोष्ट मात्र या काळासाठी नवी आहे. प्राचीन काळापासून असहमतीचं तत्त्व उपस्थित राहात आलेलं आहे. ज्या देशात उदारमतवादी, लोकशाहीवादी समाज असतो, तिथं असहमती व्यक्त करणारे प्रश्न विचारले जातात, तेव्हा भुवया उंचावल्या जात नाहीत. तर चर्चेद्वारे अशा प्रश्नांची तड लावण्यासाठी प्रोत्साहन दिलं जातं. प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार आता सार्वजनिक आहे आणि कुणीही नागरिक तो अधिकार बजावू शकतो. पूर्वी हा अधिकार केवळ सामर्थ्यवानांना होता. आता तो सर्व नागरिकांना आहे. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला समान दर्जा अभिप्रेत असल्यानं लोकशाही ही धर्मनिरपेक्ष असू शकते. असहमतीचा अधिकार आणि सामाजिक न्यायाची मागणी या खऱ्या लोकशाही संकल्पनेच्या गाभ्याशी असलेल्या गोष्टी आहेत. कारण त्यात सर्व नागरिकांचा समावेश असतो आणि कायदेशीरदृष्ट्या समान दर्जा प्राप्त झाल्यानं लोकशाही ही धर्मनिरपेक्ष असण्याव्यतिरिक्त अन्य काही असूच शकत नाही.

इथं नागरिक हा केंद्रस्थानी आहे. त्याचं हित, त्याचे अधिकार आणि कर्तव्यं ही सर्वोपरी आहेत. एकाच समाजात विविध विचार आणि मतं असलेले लोक एकत्र राहात आलेले आहेत. त्यांच्यात घर्षणंही झाली असतील, पण परस्परांबद्दलचा आदर मनुष्यत्वाच्या कसोटीवर केला गेलेला आहे. एकाच समाजात आस्तिक, नास्तिक, शाकाहारी–मिश्राहारी, विविध श्रद्धा बाळगणारे असे लोक एकाच वेळी राहात असतात. हा समाजाचा सामूहिक अवकाश असतो. समतेच्या मूल्यात कुणा एकाचं वर्चस्व मान्य केलं जाऊ शकत नाही. आज धार्मिक भावना किंवा अस्मिता दुखावण्याचे बहाणे किंवा निमित्तं करून विरोधी मतांच्या विचारांचे कार्यक्रम बंद पाडले जातात. नाटकं, चित्रपट, पुस्तकं यांच्यावर अवैध सेन्सॉरशिप लादली जाते. उदारमतवादी, लोकशाहीवादी विचारांची दडपणूक होते. राज्यसंस्थेच्या व्यवस्था यात बटीक झालेल्या गुलामांसारख्या कणाहीन वर्तन करताना दिसतात. आम्ही नागरिक आहोत. आजच्या काळात त्या सर्वसाधारण नागरिकानं काय करायला हवं, याचं सुरेख दर्शन मुंबईचे हिंदी कवी फरीद खान यांनी केलं आहे. ते म्हणतातः

मैं नागरिक हूं
सर्वोच्च पद पर आसीन हूं
मेरा फर्ज बनता है
कि अपने मातहत काम करनेवाले
राष्ट्रपति, प्रधानमंत्री और
सर्वोच्च न्यायालय की
आलोचना करूं।
हम भारत के लोग
यह वचन लें।

मित्रहो, भारतात पहिल्या शतकातच ख्रिश्चन धर्म पोहोचला होता. त्यानंतर जगातल्या बहुतेक धर्मांचे लोक अनेक शतकं इथं राहात आलेले आहेत. इतकं वैविध्य इतरत्र कुठेही सापडत नाही. यातले बरेचसे लोक शतकानुशतकं इथंच राहून इथल्या हवा–पाणी–मातीशी जोडले गेले. त्यांनीही भारत नावाच्या कल्पनेला प्रत्यक्षात

मूर्त करण्यात मदत केली. या सगळ्यांसह आपली जी संस्कृती तयार झाली तिची समृद्धी अभिमान वाटावा अशीच आहे. परंतु गेल्या काही वर्षांत मोठ्या योजनेअंतर्गत अशा अनेक अल्पसंख्य समूहांना ठरवून अन्यत्वाची (प्रस्थापित स्व पासून अदरिंगची) वागणूक देण्याचे प्रयत्न होत आहेत. फॅसिष्ट राज्यात ज्याप्रमाणे आर्य आणि ज्यू अशी विभागणी करून ज्युंचं शिरकाण झालं होतं, तीच मानसिकता इथं स्पष्टपणे दिसते. त्यामुळे एक अन्य हा शत्रू म्हणून चित्र रंगवून उभा केला की, मग त्यांना अलग करून कोपऱ्यात ढकलता येतं, त्यांना हुसकावून लावण्यासाठी, हद्दपार करण्यासाठी एक कृतक कारण निर्माण करता येतं. रोमिला थापर असं म्हणतात की, ''आज जगभरात असे अनेकविध लोक-समूह नागरिकत्व नाकारले गेल्यानं किंवा हद्दपार केले गेल्यानं निराश्रित झालेले आहेत.''

मित्रहो, अशा निर्वासितांच्या करूण कहाण्या अलीकडे गेली काही वर्षं आपण वाचत आहोत. तुर्कस्तानच्या समुद्रकाठावर वाळूत तोंड खुपसून पडलेल्या तीन वर्षांच्या मृत ॲलनचं चित्र आपल्या मनात थिजून बसलेलं आहे. महामारीच्या लाटेआधी आपण नागरिकत्व कायदा (एनआरसी) आणि नागरिकत्व दुरुस्ती विधेयक (सीएए) विषयीच्या बातम्या, त्याविरोधातली देशभरातली आंदोलनं, शाहीन बागेतलं ऐतिहासिक आंदोलन आणि त्याविषयी गोंधळ निर्माण होईल अशा सत्यालाप करणाऱ्या बातम्या असं पाहिलं. आसाममध्ये निर्वासित होऊन तीन पिढ्या इथं राहिलेल्या लोकांपुढे नागरिकत्वाचा प्रश्न उभा ठाकल्यावर ते सैरभैर झाले. त्याआधीपासूनच त्यांना 'मियां' म्हणून कशाप्रकारे हिणवलं जात होतं, त्यातून सत्तरच्या दशकात आसामी कवितेत सशक्त असं मिया पोएट्रीचं आंदोलन कसं उभं राहिलं हे आपल्याला माहीत असेल. आसाममधल्या बंगाली मुसलमानांनी आपल्या अस्मितेवर स्वतः पुन्हा या कवितेच्या आंदोलनाद्वारे दावा केला. मियां हा उर्दूमधला 'सभ्यगृहस्थ' या शब्दासाठी वापरला जाणारा आदरार्थी प्रतिशब्द आहे. पण तो हिणवण्यासाठी आणि अपमान करण्यासाठी वापरला जाऊ लागला, तेव्हा तिथल्या कवींनी 'होय, आम्ही मियां आहोत', असं म्हणत ठामपणे कवितेतून उत्तरं देत त्या शब्दाच्या अर्थाला पुन्हा सार्थ केलं. दमन आणि दडपशाहीविरुद्ध आवाज उठवणारं कवितेचं हे आंदोलन होतं. 'मियां' कवितेत या समूहाला एनआरसीतून वगळले जाण्याचे आणि त्यातल्या भयाचे प्रतिध्वनी ऐकू येतात. या कवींवर खटले भरले गेले. मियां कविता आंदोलनानं अनेक प्रश्न उभे केलेले आहेत. ते विस्थापनाचे आहेत, भाषिकतेचे आहेत, भौगोलिकतेचे, राष्ट्रीयत्वाचे, मानवीयतेचे आहेत. नागरिक आहोत की नाही आहोत, या संभ्रमाचे ते प्रश्न आहेत. या आंदोलनानं राष्ट्रवादाच्या रेट्यात दाबल्या गेलेल्या भाषेचा प्रश्न पुढे आणला. त्या भाषेच्या दुःखाचा उद्गार उच्चारित केला. जोरकसपणे ते म्हणू लागले की, 'लिहा. लिहून घ्या/ मी एक मिया आहे/लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताकाचा नागरिक/ज्याच्याजवळ कोणताही अधिकार उरलेला नाही.'

त्यातल्या अलीकडच्या काही कवितांचे मासले मी आपल्यापुढे वाचून दाखवतो.

रिजवान हुसेन नावाचा कवी (हिंदी भाषांतर) आपल्या कवितेत म्हणतोः

तुम्ही आम्हाला शिव्या द्या  
हातातून नांगर ओढून काठ्यांनी मारा  
पण आम्ही शांतपणे तुमच्यासाठी  
महाल, रस्ते, घरं बनवत राहू

तुमच्या अस्वस्थ, घामानं भिजलेल्या चरबीयुक्त शरीरांना रिक्षावर ओढतच राहू.

हा सगळा तळातला, श्रमिक वर्ग आहे. त्याच्या अस्तित्वावरच सवाल उभा राहिलेला असल्यानं तो हतबल झालेला आहे. त्याच दरम्यान ठिकठिकाणी डिटेन्शन कॅम्प्स उभारले गेल्याच्या बातम्या आलेल्या होत्या. तिथं गेल्यावर त्यांचं पुढे काय होणार कोणालाच कळणार नाही अशी फॅसिस्ट काळातल्या कॅम्प्सची आठवण करून देणाऱ्या या गोष्टी आहेत. सान मियां नावाच्या कवीनं याबाबतीत आपली व्यथा व्यक्त करताना म्हटलं आहे की, यावेळी डिटेन्शन कॅम्पमध्ये बसल्या-बसल्या आठवलं

'अरे देवा, आपणच तर ही इमारत बांधली होती  
आता आमच्याकडे काहीही नाही  
केवळ एक जोडी जुनाट लुंगी,  
अर्धवट पिकलेली दाढी

आणि आमच्या आजोबांच्या नावासोबत
शेवटच्या मतदार सूचीच्या अफेडिविटची प्रत.
बस्स.'

त्यांच्या मागण्या काहीही नाहीत. ते फक्त माणूस म्हणून आम्हाला जगू द्या, ज्या मातीत त्यांच्या पिढ्या श्रमल्या आणि मिसळल्या त्या मातीत काम करू द्या, एवढंच मागताहेत. आज दुर्दैवानं हे घटित जगभरातल्या बहुतांश भागातलं वास्तव बनलं आहे. मरम अल-मसरी, नाजवान दरविश यांच्यासारखे आपला देशच न उरलेले कितीतरी पॅलेस्टिनी, अरबी, सीरिअन कवी हीच व्यथा मांडताना आपल्याला दिसताहेत. सध्या फ्रान्समध्ये आसरा घेतलेली अनेक पुरस्कारप्राप्त सिरिअन कवयित्री मरम-अल-मसरीचे अनुभव वाचताना आपण हादरून जातोः

मिल्ट्रीतल्या दोन सैनिकांनी आणि पुरुषांच्या जत्थ्यानं लॉराला मारून टाकलं. आधी तिच्यावर अत्याचार करून/कुणी तरी तिला पाहिलं. तेव्हा ती जिवंत होती अद्याप, ज्यानं व्हिडिओ रेकॉर्ड केला आणि पोस्ट केला तो युट्युबवर/दिङ्मूढ झालेल्या लॉराचा आणि दिसत नाही/तिच्या तोंडातून रक्त ओघळताना आणि तिच्या ड्रेसवर मागच्या बाजूनंही. लॉराचा होता एक देह/आणि एक नाव होतं तिचं /लॉरा द व्हरमॉन्ट वय वर्षं १८ / जिचा खून / पुरुषांनी / राज्यसत्तेनं आणि आमच्या उदासिनतेनं-दुर्लक्षानं केला/ शनिवारी.

**कल्याणकारी राज्याचा उध्वंस**

जगभर सध्या हे असं प्रखर राष्ट्रवादाचं आणि अमानुष विस्तारवादाच्या लालसेचं फलित दिसत आहे. राष्ट्रवाद जेव्हा त्याचं टोकाचं जहाल रूप दाखवतो, तेव्हा त्याचे परिणाम अत्यंत हिंसक आणि धोकादायक असतात. त्यातील अमानुष शोषणाच्या खात्रीमुळे तो अनेक विचारवंतांनी नाकारला आहे. रवींद्रनाथ टागोरांनी त्यातले धोके ओळखले होते. स्वातंत्र्य मिळण्याअगोदर पंचवीस वर्षं आधीच १९२१ साली टागोरांनी मित्राला लिहिलेल्या पत्रात 'भारताची कल्पना' किंवा 'आयडिया ऑफ इंडिया' असा शब्दप्रयोग केला होता. आपल्याच लोकांपासून वेगळेपणाची जाणीव ही संघर्षाला निमंत्रण देणारी असते, त्या भावनेला भारताच्या कल्पनेत थारा नाही. वैविध्य असेल म्हणूनच त्यात सौंदर्य आहे, ते जिवंत आणि सळसळतं आहे, असं टागोर म्हणाले होते. म्हणूनच त्यांनी राष्ट्रवादावर प्रखर हल्ले करणारी ती तीन प्रसिद्ध व्याख्यानं दिली होती. त्यात त्यांनी युरोपीय, जपानी राष्ट्रवादाची प्रारूपं आमच्यासाठी उपयोगाची नाहीत आणि भारताच्या संदर्भात लिहितानाही ते म्हणतात की, आपल्याला आपल्या कल्पनेतल्या भारताची प्राप्ती करायची असेल, तर आपल्याला मानवतेच्या मूल्यांपेक्षाही राष्ट्र मोठं असतं, या शिकवणुकीविरुद्ध लढावं लागेल. भारतातल्या अनेक समस्यांच्या मुळाशी असलेला मोठा धोका म्हणजे राष्ट्रवाद असं त्यांनी स्पष्टपणे लिहून ठेवलेलं आहे. त्यांची ही तीनही भाषणं वाचताना लक्षात येतं की, टागोर हे राष्ट्रवाद म्हणून जी काही सर्वसाधारण समजूत आहे, तीपासून स्वतःला अलग करून शांतता, सुसंवाद आणि लोककल्याण या तत्त्वांशी स्वतःला जोडू पाहात होते.

पंडित नेहरूंनी १४ डिसेंबर १९३२ साली आपल्या मुलीला लिहिलेल्या पत्रात स्पष्टपणे लिहिलं होतं, की ''राष्ट्रवादाचा विचार किंवा भावना केवळ त्या विषयापुरती ठीक आहे, पण ती अविश्वसनीय आणि इतिहासलेखनात विक्षेप आणणारी आहे. अनेक घटनांकडे ती डोळेझाक करायला लावते आणि जेव्हा आपल्या स्वतःच्या इतिहासाचा संबंध येतो, तेव्हा या भावनेच्या तीव्रतेमुळे सत्याचाही अपलाप होतो. म्हणूनच भारताचा अलीकडचा इतिहास विचारात घेताना आपण अत्यंत सावध असले पाहिजे.'' आजच्या काळात राष्ट्रवाद आणि भांडवलवाद हे परस्परांशी घट्टपणे संबंधित आहेत. भांडवलशाहीसाठी राष्ट्रवाद हे साधन आहे आणि ते त्याचं फलितदेखील आहे. बाजारी भांडवलशाही आणि राष्ट्रवाद ही हातात हात घातलेलीच भावंडं आहेत.

जगभरात आधी उल्लेख केला, त्याप्रमाणे आज भांडवलशाही व्यवस्थांचा वाढत चाललेला जोर आहे, त्यात उदारमतवाद आणि खुनशी फॅसिस्टवाद बेमालूमपणे मिसळलेला आहे. भांडवली लोकशाहीतल्या संस्था आहेत, पण त्या सर्वंकषवादी सत्तांच्या हातातल्या कळसुत्री बाहुल्या बनल्या आहेत.

**(पृष्ठ क्र. २९ पहा)**



# नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी

बाळासो सुतार
९७३०८९१४२८

हजारो वर्षे ज्ञान देण्याच्या आणि ज्ञान घेण्याच्या लादलेल्या बंदीला झुगारून 'भेदाभेद अमंगळ' असे सांगत समतेची विचारधारा घेऊन इथल्या बहुजन समाजाला शहाणे करण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले. कीर्तन, भजनाच्या माध्यमातून महाराष्ट्राची सांस्कृतिक भूमी कसदार बनवली. नामदेव, ज्ञानदेव, गोरोबा, चोखोबा, एकनाथ, तुकाराम अशा अठरापगड जातीतून आलेल्या संताच्या शिकवणीने महाराष्ट्र अधिक सहिष्णू बनला. धर्मचिकित्सा करत किमान भक्तीच्या पातळीवर समतेचा आग्रह धरला. तत्कालिन कालखंडाची सामाजिक पार्श्वभूमी पाहिली तर त्या कालखंडामध्ये अंधश्रद्धेचे राज्य सुरू होते. अज्ञान, भीती, क्षणिक सुख आणि स्वार्थापायी अनेक यज्ञयाग, जपजाप्य, व्रत-वैकल्ये, उद्यापने, समाराधना यातच सर्वांचा वेळ जात होता. जोडीला चतुर्वर्गचितामणी' नावाचा हेमाड पंडितांचा दोन हजार व्रतवैकल्ये असणारा ग्रंथ होताच. त्यामुळे मनन, चिंतन लोप पावलेले होते. कसल्याही क्षुद्र देवतांची भक्ती करण्यात लोकांना धन्यता वाटत होती. जादुटोणा, भूत-भविष्य, तंत्रमंत्र यातच समाज अडकलेला होता. या पार्श्वभूमीवर वारकरी संप्रदायाने नामसंकीर्तनाच्या भक्तीचा नवा मार्ग समाजासमोर ठेवला आणि लोकांना कर्मकांडातून मुक्त केले. नामदेवांनी अठरापगड जातीतील संतांना सोबत घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये आध्यात्मिक लोकशाहीची स्थापना केली.

संत नामदेवांचा जन्म २६ ऑक्टोबर १२७० चा. म्हणजे ते शिवाजी महाराजांच्याही जवळपास चारशे वर्ष आधीचे. तेव्हा धर्माच्या नावाने हिंदू धर्ममार्तंड आणि मुस्लीम शासक बहुसंख्य भारतीयांना दुय्यम दर्जाचं जिणं जगण्यास भाग पाडत होते. उत्तरेत मुस्लीम सत्ता स्थिर झाली होती. दक्षिणेत त्याचा पायरव ऐकू येत होता. त्याविरुद्ध संतपरंपरेनं मोठी क्रांती घडवली. फक्त महाराष्ट्रातच नाही तर देशभरातल्या या क्रांतीचं नेतृत्व नामदेवांनी केलं. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।' म्हणत संत नामदेवांनी भक्तीतून भगव्या पताक्याखाली प्रचंड वारकरी जनसमुदाय एकत्र केला. गरीब शिंप्याच्या घरी जन्मलेला नामदेव सर्वांचा नेता म्हणून आपल्या काळात एवढे आदराचे स्थान मिळवू शकला, याचे कारण म्हणजे त्याने निरनिराळ्या जातीजमातींतील कृतिशील माणसांचा मोठाच जथा वारकरी चळवळीच्या झेंड्याखाली एकत्र आणला. उपेक्षित राहिलेल्या सामान्य माणसांना नामदेवांनी आचार-विचार दिला. नामदेव महाराज हे वारकरी धर्माचे आद्य प्रवर्तक आहेत. त्यांनी विठ्ठल जनमानसात प्रस्थापित केला आणि विठ्ठलाचं आणि पंढरपूरचं माहात्म्य रचलं. नामदेव महाराज हे संतशिरोमणी म्हणून ओळखले जातात.

नामदेव महाराज हेच वारकरी कीर्तनाचे आद्यप्रवर्तक आहेत. चंद्रभागेच्या वाळवंटात पहिलं कीर्तन नामदेव महाराजांनीच केलं आहे. नामदेव महाराज आद्य चरित्रकार आणि आद्य आत्मचरित्रकारही आहेत. त्यांनी स्वतःचंही आत्मचरित्र लिहिलं आणि संत ज्ञानदेव, मुक्ताई यांचीही चरित्रं लिहिली. त्यांनी अभंग हा नवा काव्यप्रकार शोधून काढला. त्याचं व्याकरण लिहिलं. स्वतः अभंग रचलेच; पण आपल्या सोबत असंख्यांना अभंग रचनेची प्रेरणा दिली. त्यांचा प्रभाव कन्याकुमारी ते लाहोर अशा संपूर्ण भरतखंडात पसरलेला होता. उत्तर भारतातल्या संत कबीर, संत गुरूनानक, संत मीराई आणि संत नरसी मेहता या सर्व संतांवर त्यांचा स्पष्ट प्रभाव आहे. शीखांच्या गुरू ग्रंथसाहेबात त्यांची एकसष्ट पदं आहेत. उत्तरेत त्यांची तीनशेहून अधिक मंदिरं आहेत. त्याचप्रमाणे स्वतःला नामदेव म्हणवून घेणारा समाज आहे.

बालपणापासूनच नामदेव आर्त विठ्ठलभक्ती करीत होते. त्यांच्यामुळेच निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई ही

भावंडं नाथसंप्रदायाकडून वारकरी संप्रदायाकडे वळली. देवळात कीर्तन करायला नकार मिळाल्यावर संतशिरोमणी नामदेव महाराजांनी देवळापाठी कीर्तन सुरू केलं. नामदेव महाराजांच्या कीर्तनाला अठरापगड जातीच्या लोकांचा लोंढा वळला. त्यामुळे देवळातल्या कीर्तनाला कोणी जाईनासं झालं. देऊळ ओस पडलं. अवघा जनताजनार्दन देवळाबाहेर उघड्या आकाशाखाली जमला. एकवटला. खुद्द देवानेच आपल्याकडे पाठ फिरवल्याचा अनुभव पुजाऱ्यांना आला. जिथे भक्तच नाही तिथे देव कशाला थांबेल? तो पांडुरंगही मग वाळवंटात आला. जनाई लिहितात,

'नामदेव कीर्तन करी पुढे नाचे पांडुरंग ।
जनी म्हणे ज्ञानदेवा बोला अभंग ।।
अभंग बोलता बोलता रंग कीर्तनासी भरला ।
प्रेमाचेनी छंदे विठ्ठल नाचू लागला।।'

नामदेवांच्या अभंगात पांडुरंग नाचतो, प्रेमाचा छंद लागल्याने विठ्ठल कीर्तनात नाचू लागला. त्यांनी आपल्या अभंगातून याचं वर्णन स्पष्ट शब्दात केलं आहे. ते लिहितात,

हीनदीन जाती मोरी पंढरी के राया।
ऐसा तुने नामा दर्जी काहे को बनाया।।
टाल बिना लेके नामा मंदिर में गया।
पूजा करते ब्रह्मन उन्हें बाहर ढँकाया।।
देवल के पिछे नामा अल्लख पुकारे।
जिदर जिदर नामा उदर मंदिर ही भागे।।
नाना वर्ण गाय उन का एक वर्ण दूध।
तुम कहा के बम्मन हम कहा के सूद ।।

हे मंदिरातून धक्के मारून बाहेर काढणं हीच नामदेवांची प्रेरणा ठरली असावी. देवळं हिंदूंची म्हणवायची पण मालकी ब्राह्मणांची ठेवायची असं हे पूर्वापार चालत आलं आहे.

वारकरी संप्रदाय हा अध्यात्माच्या पातळीवर वाळवंटात समतेचा आग्रह धरणारा प्रवाह असला, तरी ज्या दैवताच्या भोवती ही परंपरा उभी आहे त्या विठ्ठलाच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. नामदेव महाराज हिंदू आहेत; पण हिंदूंच्या मंदिरात कीर्तन करण्याचा अधिकार शिंपी म्हणजे शूद्र असलेल्या नामदेवांना नाही. तेव्हा तरी नव्हता. आजही शूद्रांना गर्भागृहात प्रवेश नाही. चोखोबा, हिंदू महार, पण हिंदू मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार चोखोबांना नाही. म्हणून तर मागास जातीतील संतांनी धर्मव्यवस्थेविरुद्ध आपले म्हणणे क्रांतिकारक भाषेत मांडले

'उंबरठ्याशी कैसे शिवू आम्ही जाती हीन ।
रूप तुझे कैसे पाहू त्यात आम्ही लीन।।
पायरीशी होवू दंग गाऊनी अभंग।।'

चोखोबाची ही आर्त हाक मात्र समतेचे प्रतीक असलेल्या विठ्ठलाला ऐकू यायला विसावे शतक उजाडावे लागले. तुकाराम महाराज जे सांगतात की, फिरविले देऊळ जगामाजी ख्याती । त्यामागचा इतिहास वा कथा अशी आहे. आपल्या भक्तासाठी देवानं मंदिराचं तोंडच पूर्ण विरुद्ध दिशेला वळवलं असं हे जगातलं एकमेव उदाहरण असावं. बंड केवळ जातिनिर्मूलनासाठी नव्हते तर समतेसाठी, माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक होते. संत नामदेवांच्या प्रेरणेतूनच संत चोखोबांची वाणी धर्ममार्तंडांना जाब विचारू लागली. 'आता कोठवरी भीड तुमची धरू हरी' अशा प्रकारच्या निर्भीर अभंगातून चोखोबांनी क्रांतिकारक भाषेत समतेचा पुरस्कार केला. मुक्तीची घोषणा त्यांनी अभंगातून केली म्हणूनच चोखोबांना विद्रोही संत म्हणतात. संत जनाबाईंनी स्त्रियावरील अन्यायाला वाचा फोडली. स्त्री-पुरुष समतेचा घोष संत जनाबाईंनी त्यांच्या अभंगातून केला आहे.

वैदिकांनी मंदिरातून नामदेवांना धक्के मारून बाहेर हाकलून दिलं. पण वारकऱ्यांच्या विठ्ठलाला नामदेवांचाच काय पण चोखोबांचासुद्धा विटाळ होत नाही. तो नामदेवांच्या हाताने दूधही पितो आणि चोखोबांच्या घरी जाऊन दहीभातही खातो. वैदिक धर्म स्त्रीला फक्त भोगदासी मानतो. पण वारकरी धर्म स्त्रीला पुरुषांइतकाच अधिकार असणारा माणूस मानतो. म्हणून आपला विठोबा जनाईला भांडी घासू लागतो, झाडूपुसू लागतो, दळण दळू लागतो. आपल्या वारकरी धर्मात स्त्रीपुरुष समानतेचा विचार उपजतच आहे. म्हणूनच वारकरी संतात जनाई, सोयराई, निर्मळा, मुक्ताई, कान्हाई, बहिणाईसारख्या थोर संत होऊन गेल्या. वारकरी धर्म जात वा वर्णभेद मानत नाही. म्हणून वारकरी संतात परिसा भागवत, एकनाथ महाराजांसारखे ब्राह्मण आहेत, नामदेव

ते तुकाराम महाराजांसारखे मधल्या अठरापगड जातीचे संत आहेत, संत चोखोबा, संत कर्ममेळा यासारखे त्याकाळी अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या जातीतले संतही आहेत. वारकरी धर्म धर्मभेद मानत नाही म्हणून वारकरी संतात सजन कसाई, संत कबीर, लतिफ, मोमीन, दादू पिंजारी, शेख महंमद यांसारखे अनेक मुस्लीम संत आहेत.

नामदेव, ज्ञानदेव भेटीतून विचारांचा नवा प्रवाह उदयाला येत होता. नामाची गंगा ज्ञानाच्या गंगेस मिळाली होती. ज्ञान आणि भक्तीचा हा संगम होता. त्यातून कीर्तनाच्या रंगी नाचत देशभर ज्ञानदीप लावण्यासाठी दोघांच्याही प्रभावातली सगळी संतमंडळी एकत्र झाली. नामदेव कीर्तन करताना चोखामेळ्यासारखे अस्पृश्यही टाळकरी बनून त्यांना साथ देत. जनाबाईंसारखी जातीने अतिशूद्र असणारी स्त्री कीर्तनाचं संचलन करत असे. ज्ञानदेव अभंग सुचवत. अशा जाती-पातीच्या भिंती तुटत होत्या. गोरा कुंभार, सावता माळी, परिसा भागवत, चोखा महार आणि त्यांचा परिवार, जगन्मित्र नागा, नरहरी सोनार, दासी जनी सगळेच त्यात होते. पंजाबातून जाल्हण सुतारही पंढरपुरापर्यंत सोबत आले. नामदेवांना गुरूस्थानी ठेवून चोखोबांनी जी अभंगरचना केली त्यात नामदेवाविषयी पुष्कळ लेखन केले आहे. आज उपलब्ध असलेल्या ३५८ अभंगापैकी ३२ अभंग नामदेवांसाठी वाहिलेले आहेत. प्रस्थापितांच्या विरोधात भागवत धर्मांची पताका तेराव्या शतकात नामदेवांनी व ज्ञानदेवांनी फडकावली आणि या झेंड्याखाली बंडाच्या भूमिकेत अनेक संत येऊन दाखल झाले. त्यात गोरा कुंभार, नरहरी सोनार, जनाबाई आदी संत होते. परंतु चोखोबा देखील या बंडाच्या निशाणाखाली सरसावले होते, हे विशेष! कारण कोणतीच शैक्षणिक वा आध्यात्मिक परंपरा चोखोबांच्या पाठीशी नव्हती, पाठीशी होती ती प्रस्थापितांचे प्रस्थ मोडून काढण्याची अदम्य इच्छा! आध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित करणाऱ्या त्यांच्या प्रयत्नांमध्ये चोखोबा धाडसाने व जिद्दीने सामील झाले होते. हीन जातीत जन्मलेल्या चोखोबांना त्या काळात समाजाच्या विरोधात जाऊन भागवत धर्माच्या छताखाली आणण्याचे जे धाडस नामदेव, ज्ञानदेवांनी केले, तितकेच धाडस समाजाचा कडवा विरोध पत्करून माणुसकीला काळिमा लावणारा छळ सोसून देखील या संतांच्या कार्यात सामील झाले, हे चोखोबांचे सर्वात मोठे धाडसच होते. समाजरचनेत स्वतःच्या अभिव्यक्तीतून दीनदुबळ्या वारकऱ्यांनी आत्मविश्वास कमावला. कोणतीही सामाजिक प्रतिष्ठा वा राजकीय आधार नसताना या मूक शूद्रसमूहाच्या एकाएकी असे लक्षात आले की, आपल्याला आवाज आहे. आता जबाब मागणे आणि विरोध करणे त्यांना शक्य झाले. उदाहरणार्थ, जनाबाई म्हणू शकली, 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास साधुसंता ऐसे केले जनी ।।' भक्तीसाठी याति नाही, असेही तिने ठामपणे म्हटले आहे.

जाखाई, जोखाई, बहिरोबा यांसारख्या दैवतांची बजबजपुरी माजली असताना देवशरण होऊन शेंदूर माखलेल्या दगडातच देव शोधणाऱ्या समाजावर नामदेवांनी कोरडे ओढले. 'देव दाखवी ऐसा नाही गुरू जेथ जाय तेथे दगड शेंदरू'। 'देव दगडाचा बोलेल कैचा । कोणे काळी त्यास फुटेल वाचा'।। या कर्मकांडाला विरोध करून नामसंकीर्तनासारख्या सहजसुलभ मार्गाचा त्यांनी महिमा गायला. नामसंकीर्तनाचा अट्टाहास हा कर्मठपणाची, कर्मकांडाची नांगी ठेचण्यासाठी आहे; हे सर्वसामान्यांच्या लक्षात आणून आत्मशुद्धी व सदाचरण यावर त्यांनी भर दिला. त्यांचा हा नामसंकीर्तनाचा संप्रदाय म्हणजे धर्मशिक्षणाची एक प्रचंड मोहीमच होती. देशभर प्रवास केलेल्या नामदेवांनी भक्तीचा हा नवीन विचार दक्षिणेतून घेतला असावा, असे समजले जाते. या विचाराचा प्रसार त्यांनी उत्तरेत चौदाव्या शतकाच्या सुरुवातीस केला, याबद्दल पुरावे उपलब्ध आहेत. तरीही त्यांच्या चरित्राच्या आणि कार्यक्षेत्राच्या मानाने फारच थोडी माहिती उपलब्ध आहे, असे म्हणावे लागते. गुजरात आणि उत्तरेतील पंजाबपर्यंतचे त्याच्या नंतरच्या कालखंडातले अनेक कवी, विशेषत: नरसी मेहता, मीरा, रोहिदास, कबीर आणि नानक हे त्याचे नाव अत्यंत भक्तिभावाने घेताना दिसतात.

नामदेवांनी सातशे वर्षांपूर्वी संपूर्ण भारतभर अध्यात्माची चळवळ सुरू केली. या चळवळीतूनच राष्ट्रीय एकात्मता साध्य केली. आपला उद्धार आपणच करू शकतो, हा मोलाचा संदेश त्यांनी दिला. नामदेवांनी अज्ञानाला दूर सारत कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानाचा दीप लावण्याचे महान कार्य केले. तर भागवत धर्माची पताका

महाराष्ट्राबाहेर द्वारका, मारवाड, बिकानेर, मथुरा, हरिद्वार पंजाबपर्यंत फडकवली, पंढरपुरातील विठ्ठलाच्या परिसरात सीमित झालेल्या भक्तिकेंद्राला त्यामुळे व्यापक क्षेत्र मिळालं. संत नामदेवांनी हरिनामाचा प्रसार करण्यासाठी विविध भाषा, जाती, प्रांत ही बंधने पार करून उत्तरेतही कार्य केले. महाराष्ट्रातील कीर्तन परंपरा उत्तर भारतात घेऊन गेले. समविचारी साधकाला एकत्र आणले. माणसातलं माणूसपण जागवत एक आदर्श समाज घडविण्याचे मोलाचे कार्य केले. दु:खापासून मुक्ती मिळवून सुख, शांती समाधान मिळविण्यासाठी नामस्मरणाचा सोपा मार्ग पीडित जनतेला दिला. लोकांना कर्मकांडापासून परावृत्त करून खरा धर्म सर्वसामान्यांच्या मनात रुजवला. अखंड आयुष्यभर भ्रमण करत विश्वशांतीचे स्वप्न साकार केले.

चातुर्वर्ण्याच्या चौकटीत बद्ध असलेल्या मनुआज्ञा पाळण्यात धन्यता मानणाऱ्या समाजव्यवस्थेत शूद्रातिशूद्ध म्हणून हिणवल्या जाणाऱ्या अतिसामान्य जीवन जगणाऱ्या माणसांमध्ये नामदेवांनी मानवमुक्तीचा विचार बिंबवला. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास पेरला. आत्मसन्मानाची चळवळ उभी करत तत्कालिन धर्मव्यवस्थेविरुद्ध प्रचंड मोठं बंड केलं. त्यांनी भक्तीतून म्हणजे थेट भगवंतालाच आधार मानून स्वत:च बुद्धीचा कस लावत विश्वाचे सत्य समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचाच एक भाग म्हणून ते साध्या पोशाखात चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तन करत सद्विचारांचा प्रसार करू लागले होते. ही वाट स्वत:च शोधायची होती. त्यातून साधनेची नवी-नवी साधनं निर्माण होऊ लागली. श्रोत्यालाही सामावून घेणारी वारकरी सामूहिक कीर्तन-भजनाची मुहूर्तमेढही त्यांनीच रोवली. त्यासाठी त्यांनी अभंग या छंदाची निर्मिती केली. त्यांना ऐंशी वर्षांचे दीर्घायुष लाभले. त्यांची समाधी पंढरपुरात श्रीविठ्ठल मंदिराच्या पहिल्या पायरीवर आहे.

(लेखक प्रा.डॉ.एन.डी.पाटील महाविद्यालय, मलकापूर येथे कार्यरत आहेत.)

●

---

**(पृष्ठ क्र. ५ वरुन)**

कारण जवळपास ७०० वर्षे भारतावर तुर्कांची, मोगल राजांची राजवट होती. पण स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेला हिंदू ८५ टक्के होते. या संदर्भातील दुसरी एक मिथ्यास्मृती म्हणजे मुस्लीम आक्रमकांमुळे हिंदूंमध्ये मुलींच्या बालविवाहाची प्रथा रूढ झाली. मुळात इस्लामची स्थापनाच झाली ती सातव्या शतकात झाली आणि बालविवाहाचे समर्थन करणारे स्मृतिग्रंथ पहिल्या दुसऱ्या शतकातले आहेत. पण रेटून सातत्यानं खोटं बोलत राहा आणि समूहमनात मिथ्यास्मृती निर्माण करा, हा उजव्या धर्मवादी विचारसरणीचा व्यूह आहे. आजही या दोन्ही गोष्टी त्यांच्या प्रचारकांकडून समूहमनात सातत्याने पेरल्या जात असतात.

स्मृतींचं खच्चीकरण, मिथ्यास्मृतींची पेरणी या प्रक्रियेत काही गैरसोयीच्या बाबी विस्मृतीत लोटल्या जातात. उदा. बौद्ध कालखंड. विविध प्रकारच्या शास्त्रांमधले, वैद्यकीय क्षेत्रातले नवीन शोध, विद्यापीठं, ज्ञानाच्या क्षेत्रातले त्या काळचे जागतिकीकरण हे सगळे बौद्ध कालखंडात घडले. हा खरा सुवर्णकाळ होता. पण त्याला सुवर्णकाळ न म्हणता वैदिक काळाला सुवर्णकाळ म्हटले जाते. म्हणजे एकीकडे मिथ्यास्मृती निर्माण करायची आणि दुसरीकडे बौद्ध कालखंडाच्या वैशिष्ट्यांना विस्मृतीत लोटायचे. आज इतिहासाचे फारसे वाचन नसलेल्या लोकांनाही गार्गी, मैत्रेयी ही नावे ऐकून माहीत असतात. कारण वेदकाळात या विदुषी होऊन गेल्या असे सतत वेगवेगळ्या माध्यमातून सांगितले जाते. गार्गी, मैत्रेयीबद्दल वैदिक विचारांच्या अभ्यासकांना जरूर आदर असावा. मात्र त्याचवेळी ही अभ्यासक मंडळी संघमित्रा हे नाव का उच्चारत नाहीत, हा प्रश्न उपस्थित करायला हवा. ज्या स्त्रीने दोन हजार वर्षांपूर्वी आपल्या भूभागाच्या सीमा ओलांडून धम्मप्रसाराचे काम केले म्हणजेच त्यातील नीतीमूल्ये, तत्त्वज्ञान प्रसारित करण्याचे, त्यासंबंधी विचारविमर्श करण्याचे काम केले, तिचे नाव प्राचीन काळातील विदुषींची नावे घेताना घेतले जात नाही. ते विस्मृतीत लोटण्याचे प्रयत्न केले जातात. इथे जो काही इतिहास आहे तो वैदिक संस्कृतीचा आहे, हे वेगवेगळ्या मार्गाने प्रस्थापित करत राहाणे, हे इथल्या वैदिक संस्कृतीचे सांस्कृतिक राजकारण आहे.

क्रमश:

(लेखिका अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या सल्लागार मंडळ सदस्या आहेत.)

सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील पहिल्या जनवादी साहित्य-संस्कृती संमेलनातील अध्यक्षीय भाषण

●

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती राज्य कार्यकारिणी

### (जून २०२२ - मे २०२५)

**अध्यक्ष**



**अविनाश पाटील**
धुळे

**उपाध्यक्ष**



**डॉ. प्रदीप पाटकर**
रायगड



**उत्तम कांबळे**
नाशिक



**प्रा.शामराव (अण्णा) पाटील**
सांगली



**महादेवराव भुईभार**
अकोला



**डॉ.रश्मी बोरीकर**
औरंगाबाद

**कार्याध्यक्ष**




**माधव बावगे**
लातूर

**राज्य प्रधान सचिव**



**संजय बनसोडे**
सांगली



**गजेंद्र सुरकार**
वर्धा




**नंदकिशोर तळाशिलकर**
मुंबई



**डॉ.ठकसेन गोराणे**
नाशिक

**राज्य सरचिटणीस**



**संजय शेंडे**
नागपूर



**बबन कानकिरड**
अकोला



**विनायक सावळे**
नंदूरबार



**ॲड. रंजना पगार–गवांदे**
अहमदनगर



**शहाजी भोसले**
औरंगाबाद



**रूक्साना मुल्ला**
लातूर



**विजय परब**
मुंबई



**सचिन थिटे**
मुंबई



**सुधाकर काशीद**
सोलापूर



**कृष्णात कोरे**
कोल्हापूर

# विविध विभागाचे राज्य कार्यवाह व सहकार्यवाह

### बुवाबाजी विरुद्ध संघर्ष

राज्य कार्यवाह



**ॲड.गोविंद पाटील**
सोलापूर

सहकार्यवाह



**विष्णू लोणारे**
भंडारा



**प्रा.डॉ.आदिनाथ इंगोले**
नांदेड

### वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प

राज्य कार्यवाह



**प्रा. दिगंबर कट्यारे**
जळगाव

सहकार्यवाह



**विलास निंबोरकर**
गडचिरोली



**प्रकाश कांबळे**
वर्धा

### युवा सहभाग

राज्य कार्यवाह



**प्रियंका खेडेकर**
रायगड

सहकार्यवाह



**रुपेश वानखेडे**
यवतमाळ



**अमोल चौगुले**
ठाणे

### विविध उपक्रम

राज्य कार्यवाह



**अनिल करवीर**
पालघर

सहकार्यवाह



**रामदास देसाई**
कोल्हापूर

### दस्तऐवज संकलन

राज्य कार्यवाह



**सुरेश बिऱ्हाडे**
धुळे

### महिला सहभाग

राज्य कार्यवाह



**आरती नाईक**
पनवेल

सहकार्यवाह



**सारिका डेहनकर**
वर्धा

### मिश्र विवाह विभाग

राज्य कार्यवाह



**दिलीप आरळीकर**
लातूर

सहकार्यवाह



**अतुल बडवे**
जालना

### प्रशिक्षण विभाग

राज्य कार्यवाह



**प्रा.सुरेश बोरसे**
धुळे

सहकार्यवाह



**सुधाकर तट**
बीड

### विवेक जागर प्रकाशन व वितरण

राज्य कार्यवाह



**विशाल विमल**
पुणे

सहकार्यवाह



**नवल ठाकरे**
धुळे

### मानसिक आरोग्य व्यवस्थापन

राज्य कार्यवाह



**डॉ. प्रदीप जोशी**
जळगाव

सहकार्यवाह



**डॉ. अनिल डोंगरे**
रायगड

### विज्ञानबोध वाहिनी

राज्य कार्यवाह



**भास्कर सदाकळे**
सांगली


सहकार्यवाह



**बाबा हलकुडे**
लातूर

### सांस्कृतिक अभिव्यक्ती

राज्य कार्यवाह



मनोहर जायभाये
बीड

सहकार्यवाह



एस.एस.शिंदे
ठाणे

### सोशल मीडिया व्यवस्थापन

राज्य कार्यवाह



किर्तीवर्धन तायडे
नंदुरबार

सहकार्यवाह



रविराज थोरात
पुणे

### निधी व्यवस्थापन

राज्य कार्यवाह



परेश शाह
धुळे

सहकार्यवाह



सुधीर निंबाळकर
ठाणे

### कायदेविषयक व्यवस्थापन

राज्य कार्यवाह



ॲड. मनीषा महाजन
पुणे

सहकार्यवाह



ॲड. तृप्ती पाटील
ठाणे

### विवेक वाहिनी

राज्य कार्यवाह



प्राचार्य डॉ.सविता शेटे
बीड

सहकार्यवाह



प्राचार्य डॉ.विठ्ठल घुले
परभणी

### जातपंचायतीला मूठमाती अभियान

राज्य कार्यवाह



कृष्णा चांदगुडे
नाशिक

### जोडीदाराची विवेकी निवड

राज्य कार्यवाह



हर्षल जाधव
कोल्हापूर

### राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समन्वय

राज्य कार्यवाह



डॉ. सुदेश घोडेराव
नाशिक

### थॉट विथ ॲक्शन

राज्य कार्यवाह



हर्षदकुमार मुंगे
पुणे

### कार्यालयीन व्यवस्थापन

राज्य कार्यवाह



उत्तरेश्वर बिराजदार
लातूर

## अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका संपादक मंडळ

संपादक



प्रा. डॉ. नितीन शिंदे
सांगली

कार्यकारी संपादक



उत्तम जोगदंड
ठाणे

सहसंपादक



प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर
सांगली

## संपादक मंडळ सदस्य


**प्रा. डॉ.मांतेश हिरेमठ**
कोल्हापूर


**प्रा.डॉ.सुशील मेश्राम**
नागपूर


**डॉ.अरुण शिंदे**
कोल्हापूर


**डॉ.बाळू दुगडूमवार**
नांदेड


**प्रल्हाद मिस्त्री**
नाशिक

### व्यवस्थापकीय संपादक


**अजय भालकर**
सांगली

### व्यवस्थापकीय सदस्य


**राजेंद्र फेगडे**
नाशिक


**तुकाराम शिंदे**
उस्मानाबाद

### सल्लागार मंडळ



**किशोर बेडकिहाळ**
सातारा


**डॉ.प्रदीप पाटकर**
रायगड


**संध्या नरे–पवार**
मुंबई

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे निमंत्रित


**प्राचार्य अनिरुद्ध जाधव**
लातूर


**विजय सालंकार**
नागपूर


**कॉ. बाबा अरगडे**
अहमदनगर


**उल्हास ठाकूर**
रायगड


**प्रा. डॉ. नरेश आंबिलकर**
भंडारा


**सुशिला मुंडे**
नवी मुंबई


**प्राचार्य मच्छिन्द्रनाथ मुंडे**
नवी मुंबई


**सुरेखा भापकर**
मुंबई


**नितीनकुमार राऊत**
रायगड


**हरिदास तम्मेवार**
लातूर



# पुस्तक प्रकाशनाचा दिमाखदार सोहळा

मच्छिंद्रनाथ मुंडे
९९६९४३७०२

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती विस्तारित राज्य कार्यकारिणी निवड सभा दि. ३ ते ५ जून २०२२ रोजी औरंगाबाद येथील एम.जी.एम. संस्थेच्या आर्यभट्ट सभागृहात शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर मंचावर आयोजित करण्यात आलेली होती. सदर मंचावरून दि. ४ जून रोजी ठीक सकाळी ११.३० वा. महाराष्ट्र अंनिस, विवेक जागर प्रकाशन, धुळे तर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या चार पुस्तकांचे व मध्यमा प्रकाशन नागपूरद्वारे प्रकाशित केलेले एक पुस्तक अशा एकूण पाच पुस्तकांचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आलेला होता. सदर पुस्तकांचा प्रकाशन समारंभ प्रसिद्ध लेखक व ज्येष्ठ पत्रकार मा. जयदेव डोळे व लातूरचे आमदार मा. विक्रम काळे यांच्या हस्ते पार पडला. सदर प्रसंगी मंचावर पाचही पुस्तकांचे लेखक मच्छिंद्रनाथ मुंडे (चमत्कार एक भूलभुलैया १००), डॉ. प्रा. सुशील मेश्राम (अवयवदान देहदान भ्रम व निर्भ्रम आणि देहदान व अवयवदान – मृत्यूनंतरची सुंदर भेट), कृष्णा चांदगुडे (जातपंचायतीला मूठमाती आवृत्ती २री) व आरती नाईक संपादित (नात्यातील सुरेल संवादासाठी जोडीदाराची विवेकी निवड) हे लेखक/संपादक उपस्थित होते. वरील सर्व लेखकांनी आपापल्या पुस्तकातील समाविष्ट भागाविषयी विवेचन केले व महाराष्ट्र अंनिस विवेक जागर प्रकाशन विभाग कार्यवाह मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना ५०% सवलतीत पुस्तके देण्याचे जाहीर केले. सर्वांनी ती खरेदी करण्याचे आवाहन देखील करण्यात आले.

सदर प्रसंगी मा. आमदार विक्रम काळे यांनी आपले विचार व्यक्त करताना असे म्हटले की, 'चमत्कार एक भूलभुलैया' या पुस्तकाचे लेखक मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी समाधीमागचे विज्ञान काय आहे? हे या पुस्तकात समाविष्ट केलेले आहे, ही गोष्ट वाखण्यासारखी आहे. यावरून महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते कृतिशीलपणे जे करतात तेच व्यक्त करतात व तसे वागतातदेखील. हे सर्वात महत्त्वाचे आहे. पुढे त्यांनी आपल्या भाषणामध्ये असेही जाहीर केले की, सदर पाचही पुस्तकांची विक्री होऊन जी पुस्तके येथे शिल्लक राहातील ती सर्व पुस्तके मी स्वतः विकत घेत आहे, असं म्हणताच प्रचंड टाळ्यांच्या कडकडात कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सदर समारंभ प्रसंगी प्रसिद्ध ज्येष्ठ लेखक व पत्रकार जयदेव डोळे यांनी आपले विचार व्यक्त करताना संपादिका आरती नाईक यांच्या जोडीदाराची विवेकी निवड या पुस्तकावर विचार व्यक्त करताना असे म्हटले की, यापुढे होणाऱ्या स्त्री-स्त्री व पुरुष-पुरुष यांची ही लग्न नात्यातील सुरेल संवादासाठी कशी उपयुक्त ठरतील त्यांना देखील जोडीदाराची विवेकी निवड कशी करता येईल? या गोष्टीचा देखील समावेश पुस्तकात करावा असं आवाहन करण्यात आले. आपल्या विवेचनात ते पुढे असे म्हणाले की, एका बाजूला धर्मांध शक्तीचा जोर वाढत आहे त्यामुळे सनातनी शक्तीद्वारे थेट संविधानाच्या मूळ ढाच्यालाच सुरूंग लावायला सुरुवात झालेली आहे म्हणून आपल्यासारख्या तरुणाईने सजग व जागृत असायला हवे

सदर कार्यक्रमा प्रसंगी मंचावरून महा. अंनिसचे अध्यक्ष मा. अविनाश पाटील (भाई) यांनी सर्वच लेखकांनी अतिशय कष्टाने पुस्तकाचे निर्माण केले आहे. देहदान अवयवदान हा समितीचा उपक्रम आहे. समितीतील अनेक कार्यकर्त्यांनी देहदान अवयवदान संकल्प पत्र भरून दिले आहेत. डॉ.सुशील मेश्राम यांची अवयवदान या विषयावरील दोन्ही पुस्तके शास्त्रशुद्ध आहेत. प्रकाशन झालेली पाचही पुस्तके कार्यकर्त्यांनी स्वतः वाचायलाच हवे आणि इतरांनाही वाचायला प्रवृत्त करावी असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ. रश्मी बोरीकर व महा. अंनिसचे राज्यकार्याध्यक्ष माधव बावगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे यांनी केले.

(लेखक अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत.)



# समारंभ : पुरस्कार वितरणाचा

उत्तम जोगदंड
९९२१२८६२८

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र असलेल्या 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' (अंनिप) हे मासिक जुलै २०२१ पासून पीडीएफ स्वरूपात सुरू केले. नोव्हेंबर-डिसेंबर २०२१चा जोड-विशेषांक मुद्रित स्वरूपात करण्याचे ठरवले. यानिमित्त देणगी आणि जाहिरातीच्या मार्गाने संघटनेसाठी निधी संकलन करणे हा उद्देश होता. कार्यकर्ते उमेदीने कामाला लागले आणि बघता बघता केवळ एक-दीड महिन्याच्या कालावधीत झपाटल्यासारखी मेहनत करून जवळपास ४९ लाख रुपयांचा निधी (देणग्या आणि जाहिराती) संघटनेसाठी संकलित केला. कार्यकर्त्यांनी केलेल्या या मेहनतीला, जिद्दीला, संघटनेच्या विचारावरील निष्ठेला दाद देण्यासाठी, त्यांचे कौतुक करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी 'लक्षवेधी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्याचे ठरले. दिनांक ३ ते ५ जून २०२२ या तीन दिवसांत औरंगाबाद येथे आयोजित संघटनेच्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीच्या दि. ५ जून २०२२ रोजी 'लक्षवेधी पुरस्कार' सोहळा पार पडला.

'लक्षवेधी पुरस्कार' समारंभ हा दोन विभागांत घेण्यात आला, शाखांसाठी आणि कार्यकर्त्यांसाठी. ज्या शाखेने एक लाख रुपयांपेक्षा अधिक निधी संकलित केला आहे अशा शाखा/जिल्हे आणि ज्या कार्यकर्त्यांनी रु.७५००० पेक्षा अधिक निधी संकलित केला आहे असे कार्यकर्ते पुरस्कारासाठी पात्र ठरले. 'लक्षवेधी पुरस्कार' प्राप्त शाखा आहेत, शहादा, नंदुरबार, शिवाजीनगर, आकुर्डी, चाकण, इस्लामपूर, लातूर शहर, पनवेल, अलिबाग, शिंदखेडा, दोंडाईचा, जळगाव, वर्धा, चंद्रपूर आणि काही जिल्ह्यांतील सर्व शाखांना एकत्रित स्वरूपातसुद्धा हा पुरस्कार देण्यात आला. त्यामध्ये नागपूर, ठाणे, बीड, मुंबई आणि नाशिक या जिल्ह्यांचा समावेश होता. व्यक्तिगत देणगी/जाहिरात निधी संकलनाच्या कामगिरीनुसार 'लक्षवेधी पुरस्कार' मिळवणारे कार्यकर्ते आहेत, रवींद्र पाटील, वसंत वळवी, कीर्तीवर्धन तायडे, अतुल सवाखंडे, माधव बावगे, निर्भय कोरे, रुक्साना मुल्ला, नितीन राऊत, आशाताई टोणगावकर, दिगंबर कट्यारे, गजेंद्र सुरकार, माधुरी झाडे, विजय सालंकर, पी. एम. जाधव, सविता शेटे आणि श्रीनिवास शिंदे. माधव बावगे यांनी तो पुरस्कार अन्य साथींना स्वीकारायला लावला.

याशिवाय १०० पेक्षा अधिक वर्गणीदार मिळवणाऱ्या कार्यकर्त्यांना 'शतकवीर पुरस्कार २०२१' विलास निंबोरकर व विठ्ठलराव कोठारे यांना देण्यात आला. विशेष म्हणजे एखादे मासिक चालविण्याचा कसलाही अनुभव नसताना, तांत्रिक मदत नसताना, अत्यंत तुटपुंजी संसाधने उपलब्ध असताना 'अंनिप'चे व्यवस्थापन करणारे व्यवस्थापकीय संपादक अजय भालकर यास 'उत्कृष्ट व्यवस्थापक पुरस्कार २०२१' देण्यात आला. लक्षवेधी पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कॉ. डॉ. भालचंद्र कांगो उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महा. अंनिसचे अध्यक्ष अविनाश पाटील यांनी भूषवले. विचारमंचावर कार्याध्यक्ष माधव बावगे, उपाध्यक्षा रश्मी बोरीकर, राज्यप्रधान सचिव संजय बनसोडे, गजेंद्र सुरकार, ठकसेन गोराणे, 'अंनिप'चे संपादक आणि संपादक मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

प्रा. डॉ. नितिन शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून सर्व मान्यवरांचे आणि उपस्थितांचे स्वागत केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी 'लक्षवेधी पुरस्कार' देण्यामागील पार्श्वभूमी विशद केली. प्रमुख पाहुणे कॉ. डॉ. भालचंद्र कांगो यांचा परिचय महा. अंनिसच्या उपाध्यक्षा रश्मी बोरीकर यांनी करून दिला. 'अंनिप' अंक छपाईच्या तांत्रिक अंगांपासून ते देणगीदार/वर्गणीदार यांची माहिती संगणकात टाकण्यापर्यंत विविध कामात सातत्याने मदत करणाऱ्या विशाल विमल या तरुण

कार्यकर्त्याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पुरस्कार विजेत्यांची नावे वाचण्यापूर्वी त्याने संबंधित शाखा, जिल्हे आणि कार्यकर्ते यांच्या देणगी-जाहिरात संकलन याविषयी माहितीचे विश्लेषण केले. प्रमुख पाहुणे कॉ. डॉ. भालचंद्र कांगो, महा. अंनिसचे अध्यक्ष अविनाश पाटील, कार्याध्यक्ष माधव बावगे यांच्या हस्ते सर्व पुरस्कार विजेत्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, पुस्तके आणि गुलाब पुष्प देऊन पुरस्काराचे वाटप करण्यात आले.

पुरस्कार वितरणानंतर दोन पुरस्कार विजेत्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त करण्यासाठी सुचविण्यात आले. त्यापैकी रुक्साना मुल्ला, राज्य सरचिटणीस यांनी अत्यंत खुसखुशीत शैलीत त्या आणि त्यांचे कुटुंबीय यांनी निधी संकलन करण्यासाठी केलेल्या कामाची आणि त्यासाठी वापरलेल्या काही उद्‌बोधक युक्त्यांची माहिती दिली. श्रीनिवास शिंदे या कार्यकर्त्यानेही आपले अनुभव सांगितले. प्रमुख पाहुणे कॉ. डॉ. भालचंद्र कांगो यांनी प्रतिकूल परिस्थितीत कार्यकर्त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. पुरोगामी आणि परिवर्तनवादी चळवळीसमोर गेल्या काही वर्षांत आलेल्या आव्हानांसंबंधी त्यांनी विश्लेषण केले. समाजात पसरवल्या जात असलेल्या द्वेषाचा सामना समता, शांतता, सद्‌भाव या आधारेच केला गेला पाहिजे, असा सल्ला त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. अन्य विविध विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले.

नुकतेच महा. अंनिसच्या कार्याध्यक्षपदावर निवड झालेले माधव बावगे यांनीही कार्यकर्त्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले. सर्वांनी अशीच जोमाने साथ द्यावी आणि चळवळ पुढे घेऊन जाण्यास मदत करावी असे आवाहन त्यांनी केले. महा. अंनिसचे अध्यक्ष दिवंगत एन. डी. पाटील यांच्या निधनामुळे संघटनेचे अध्यक्षपद रिक्त झाले होते. त्या पदावर क्रियाशील अध्यक्ष म्हणून अविनाश पाटील यांची निवड झाली. त्यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्ष या नात्याने सर्व कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे शेवटी 'अंनिप'चे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांनी आभार मानले.

(लेखक अंनिपचे कार्यकारी संपादक आहेत.)

●

## हातपाय बांधून अघोरी पूजेचा प्रयत्न अंनिसमुळे थांबला

नाशिकच्या देवळा तालुक्यातील चिंचवे येथील एका मानसिक रुग्णाचे हातपाय दोरीने बांधून अघोरी पूजा करण्याचा प्रयत्न झाला. पीडित हा मानसिक आजाराने त्रस्त असल्याने नातेवाईकांनी त्याला अनेक देवस्थानी ठेवले पायात लोखंडी बेडी घातली. परंतु इलाज काही येत नव्हता. शिरवाडे (वाकद) येथील एका भगताने त्यांना अघोरी पूजा करण्यास सांगितली. त्यासाठी गोदावरी नदीत आंघोळ घालून अघोरी पूजा करण्यात येणार होती. मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास नातेवाईक व भगत हे मोर्विस गावात आले. नदीकाठी रहदारीपासून दूर अंतरावर एकांतात जमा झाले. गावकऱ्यांना हे संशयास्पद वाटल्याने ते तिथे जावून भयानक प्रकार पाहिला. मोर्विसचे पोलीस पाटील सोमनाथ पारखे व गावकरी गोरख कोकाटे यांनी म.अंनिसचे कार्यकर्ते कृष्णा चांदगुडे यांना फोन करून घटनेची माहिती दिली. चांदगुडे यांनी हा जादूटोणाविरोधी कायद्यान्वये गुन्हा असल्याचे नातेवाईकांना सांगितले. पीडितास मानसिक आजार असल्याने त्याला मानसोपचार तज्ज्ञाची गरज गावकऱ्यांनी पीडितास बांधलेल्या दोरीतून मुक्त केले व पोलिसांना घटनेची माहिती दिली. अंनिस व गावकऱ्यांच्या जागरुकतेमुळे अघोरी प्रयत्न थांबला. दरम्यान, प्रसारमाध्यमांनी या वृत्ताची दखल घेतली. सदरची बातमी वाचून शिर्डी येथील मानसोपचार तज्ज्ञ डॉ. ओंकार जोशी यांनी पीडित रुग्णावर मोफत उपचार करण्याची तयारी दाखवली.

●

**महा. अंनिसच्या कामाचे आपण आधारस्तंभ आहात!**
**समिती आपली ऋणी आहे!**

**डॉ. सचिन पवार**, पेठ वडगांव
**विकास पाटील**, इस्लामपूर
**डॉ. प्रशांत पतंगराव यादव**, पेठवडगांव
**वामनराव श्रीरंगराव पांडगळे**, तुळजापूर
**शिरीष कुंभारकर**, नाशिक





# जनप्रबोधन यात्रा : वारसा संतांचा अंधश्रद्धा निर्मूलनाचा

मनोहर जयभाये
९७६७७०७९१७

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा विविध उपक्रम विभाग, सांस्कृतिक विभाग व विवेक जागर संस्था यांच्या वतीने दि. १४ मे ते २३ मे २०२२ या कालावधीमध्ये वारसा संतांचा! अंधश्रद्धा निर्मूलनाचा!! जन्मभूमी, कर्मभूमी व समाधीस्थळी अभिवादन प्रवचन व कीर्तन करत ही प्रबोधन यात्रा काढण्यात आली. या यात्रेची सुरुवात राष्ट्रसंत गाडगे बाबांची जन्मभूमी शेंडगाव येथून झाली व समारोप श्री संत नामदेव महाराजांच्या समाधीला अभिवादन करून संत तनपुरे महाराजांच्या मठामध्ये झाला. वारकरी संत समाजसुधारकांनी धर्माची कृतिशील चिकित्सा करून विवेकाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी संतसाहित्याची निर्मिती केली आहे. मंदिरातील कीर्तन व भक्ती परंपरा वाळवंटात घेऊन जाणारे नामदेव महाराजांपासून संत गाडगेबाबापर्यंत सर्व संतांनी जातिभेद, वर्णभेद, तीर्थ क्षेत्रातील शोषण, अनिष्ट प्रथा व अघोरी कर्मकांडे, लिंगभेद, नवससायस, भोंदूगिरी, तंत्रमंत्र यावर प्रहार केले आहेत. समताधिष्ठित विवेकी समाजनिर्मितीचा प्रयत्न केलेला आहे.

'सकळांशी आहे येथे अधिकार' हा संत तुकोबाराय यांचा विचार घेऊन 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी' या संत नामदेव महाराजांच्या वचनाला जागून संतसाहित्याचे गाढे अभ्यासक ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर व ज्येष्ठ सामाजिक विचारवंत सुभाष वारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रबोधन यात्रा काढण्यात आली. नितीन राऊत व विविध उपक्रम विभागाचे कार्यवाह अनिल शोभना वसंत यांनी या यात्रेचे नियोजन केले होते. या यात्रा अभियानाचे प्रमुख हरिदास तम्मेवार, मनोहर जायभाये, हनुमंत मुंढे होते. या यात्रेसोबत सुरुवातीचे तीन दिवस, शेवटचे तीन दिवस राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे उपस्थित होते. ही यात्रा शेंडगाव, मोझरी, मुक्ताईनगर, निफाड, त्र्यंबकेश्वर, देहू, आळंदी, पिंपळनेर, श्रीगोंदा, पैठण, आपेगाव, दौलताबाद, जालना, नरसी नामदेव, गंगाखेड, परळी, तेर, अरण, मंगळवेढा मार्गे जाऊन पंढरपूर येथे समारोप झाला. उद्‌घाटनापासून समारोपापर्यंत एकूण २२ कार्यक्रम झाले. ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी ६ कीर्तन, प्रवचने केली. ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांनी दोन कीर्तन, प्रवचने केली. इतर सर्व ठिकाणी माधव बावगे, हरिदास तम्मेवार, मनोहर जयभाये व हनुमंत मुंडे यांनी व्याख्याने व प्रवचने केली.

ही यात्रा यशस्वी होण्यासाठी बबनराव कानकिरड, डॉ. संजय तिडके,गजेंद्र सुरकार, सुयश तोष्णीवाल, महादेव भुईभार, प्रविण गुल्हाने, मोहन मेढे, अशोक तायडे, डॉ. ठकसेन गोराणे, उत्तम डेरले, डॉ. समीर शिंदे, कृष्णा चांदगुडे, शिवाजीराव ढेपले, संजय बारी, बाबा अरगडे, प्राचार्य शिवाजी देवढे, संजय नांगरे, भाऊसाहेब पठाडे, बसवराज कोरे, प्राचार्य विठ्ठल घुले, विलास रोडे, रानबा गायकवाड, विकास वाघमारे, अशोक मुंढे, सौंदळे सर, सुकेशनी नाईकवाडे, गोविंद सोनपिर, सुधाकर तट, तानाजी पिंपळे, सुधाकर काशीद, धर्मराज चवरे, डॉ. गोविंद पाटील, निशिकांत प्रचंडराव इत्यादी कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही कुठल्याही देव किंवा धर्म विरोधात नसून संतांनी जो समाजपरिवर्तनाचा विवेकी वारसा दिला आहे त्यात विचारांचा प्रचार व प्रसार करते हा विचार अनेक वारकरी व कीर्तनकारांनी मान्य केला आहे. या यात्रेदरम्यान भेट झालेल्या अनेक कीर्तनकार महाराजांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. मुक्ताईनगर येथील ह.भ.प. उद्धव महाराज व ह.भ.प. रविंद्र महाराज हरणे यांनी संत मुक्ताई मंदिरात प्रवचन करण्यासाठी सहकार्य केले. त्र्यंबकेश्वर येथील श्री संत निवृत्तीनाथ महाराज मंदिराचे प्रशासक व ह.भ.प. भाऊसाहेब गंभीरे महाराजांनी तर मंदिरामध्ये या दिंडीचे भव्य स्वागत केले व त्यांनी प्रवचनात संत तुकोबाराय महाराजांनी आपल्या अभंगांमधून शोषणमुक्त

समाजनिर्मितीसाठी नवस, बहुदेवता वाद, अंगात येणे, भोंदूगिरी यांना कसा विरोध केला हे सांगितले. आळंदी येथे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे वंशपरंपरागत चोपदार ह.भ.प. राजाभाऊ चोपदार महाराज यांनी स्वागत केले. संतांचे विचार समाजाच्या कल्याणासाठी असून अंनिसचे संत विचाराचा सर्वत्र जागर करण्यासाठी सदिच्छा दिल्या.

श्रीगोंदा येथे श्री संत शेख महंमद महाराजांच्या समाधी दर्ग्याचे विश्वस्त अजीज हुसेन शेख यांनी या यात्रेचे स्वागत करून राष्ट्रीय एकात्मतेसाठी ही यात्रा प्रेरणादायी आहे, असे मनोगत व्यक्त केले. श्रीक्षेत्र पैठण येथील गीता मंदिराचे प्रमुख ह.भ.प. विष्णु महाराज जगताप यांनी महात्मा फुले व संतांचे विचार समाजाचे कल्याण करणारे आहेत हे सांगितले. खरं म्हणजे संतांचे विवेकी अभंग वारकरी कीर्तनकारांनी समाजात घेऊन जायला पाहिजे. परंतु बरेच कीर्तनकार अशी हिंमत दाखवत नाहीत अशी खंत व्यक्त केली. दौलताबाद येथे विचार विद्यालय विद्या वाचस्पती जगन्नाथ महाराज पवार समाधी मंदिराचे प्रमुख ह.भ.प. परमेश्वर महाराज कोरडे, ह.भ.प. नारायण महाराज कोरडे इत्यादींनी स्वागत केले व आणि संथ विचारांचा महाराष्ट्रभर जागर करत असल्याबद्दल कौतुक केले व हा विचार कीर्तनकारांनी व्यापक प्रमाणात मांडणे गरजेचे असल्याचे परमेश्वर महाराजांनी सांगितले.

जालना येथील ही ह.भ.प. शंकर महाराज राऊत यांनी या प्रबोधन यात्रेचे स्वागत केले व महाराज समाज प्रबोधनासाठी आणि सोबत असल्याचे सांगितले. परळी वैजनाथ येथे अंनिस कार्यकर्त्यांनी सोबतच वारकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे, ह.भ.प. माऊली महाराज, गोविंद महाराज, सचिन महाराज यांनी स्वागत केले व रामेश्वर महाराजांनी वारकरी व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. अरुण येथे ह.भ.प. हरी महाराज पात्रुडकर, ह.भ.प. संजय नाळे, ह.भ.प. सत्यभामा ताई वसेकर, विठ्ठल गाजरे यांनी स्वागत केले. मंगळवेढा येथे संत चोखामेळा देवस्थानचे अध्यक्ष जयराज शेंबडे व नगरपालिकेचे कार्यकारी अधिकारी निशिकांत प्रचंडराव यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी स्वागत केले. या यात्रेचा समारोप पंढरपूर येथील तनपुरे महाराजांच्या मठात झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष अविनाशभाई पाटील हे होते, तर प्रमुख पाहुणे सचिन परब ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज, राजाभा वसाक, अंनिसचे कार्याध्यक्ष माधव बावगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल शोभना वसंत यांनी केले. प्रास्ताविक मनोहर जयभाये यांनी केले.

(लेखक महा.अंनिसच्या सांस्कृतिक अभिव्यक्ती विभागाचे राज्य कार्यवाह आहेत.)

●

## विविध उपक्रमांच्या वाटेवर (जुलै २०२२)

**रक्तदान अभियान (१० जुलै २०२२)**
धर्माने सांगितलेल्या मानवी मूल्यांमध्ये त्याग हे महत्त्वाचे मूल्य आहे. इस्लाम धर्मातही उच्च ध्येय सिद्ध करण्यासाठी कुर्बानी किंवा सर्वस्वाचा त्याग करण्याची शिकवण आहे. त्याग आणि बलिदानाचे प्रतीक म्हणून 'ईद-उल-अजहा'(बकरी ईद) सण इस्लाम धर्मियांमध्ये साजरा केला जातो. यानिमित्ताने प्राण्यांची कुर्बानी देण्याची प्रथा पाळली जाते. सर्वधर्मियांनी धार्मिक सण हे अधिकाधिक समाजाभिमुख व मानवतावादी करणे हे धर्माचेच उन्नयन आहे. हाच विचार समोर ठेवून महाराष्ट्र अंनिस बकरी ईदनिमित्त पशूची कुर्बानी देण्याच्या प्रथेमध्ये कालानुरूप बदल व्हावा यासाठी राज्यव्यापी रक्तदान सप्ताह अभियान राबवत आहे.

**लैंगिकता प्रबोधन (१५ -२१ जुलै २०२२)**
लैंगिक शिक्षण हे उद्दिष्ट समोर ठेवून र.धों. कर्वे यांनी १५ जुलै १९२७ ला 'समाजस्वास्थ्य' या मासिकाची सुरुवात केली. त्यानिमित्ताने या अभियानाचे आयोजन करण्यात येत आहे. मुलांच्या मनात लैंगिकतेसंबंधी अनेक प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांची योग्य उत्तरं मिळाली नाहीत, तर गैरसमज निर्माण होऊ शकतात. हे गैरसमज दूर व्हावेत, वयात येताना होणारे शारीरिक, भावनिक बदल, स्त्री-पुरुष संबंध, हस्तमैथुन, मासिक पाळी, गर्भधारणा, समलिंगी संबंध, या सर्वांची वयानुरूप योग्य ती शास्त्रीय माहिती देणे. तसेच गर्भाचे लिंग कसे ठरते इथपासून ते एकतर्फी प्रेम म्हणजे काय? या सर्वांची शास्त्रीय माहिती देत शाळा-कॉलेजमध्ये लैंगिकता प्रबोधन' अभियान राबवले जात आहे. यानिमित्ताने शाखेने बॅनर्स, पोष्टर्स तयार करुन, शाळा, महाविद्यालयांत व्याख्यांनाचे आयोजन करणे, वयात येताना चित्रफित दाखवणे व चर्चासत्राचे आयोजन करणे.

●

# विस्तारित राज्य कार्यकारिणी वृत्तांत



डॉ. ठकसेन गोराणे
९४२०८२७९२४

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक दि. ३ ते ५ जून २०२२ अखेर औरंगाबाद येथील महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील आर्यभट्ट सभागृहात उत्साहात पार पडली. या बैठकीस ३२ जिल्ह्यांतून १७२ पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. औरंगाबाद जिल्हा अध्यक्षा डॉ. रश्मी बोरीकर यांनी उपस्थितांचे स्वागत केल्यानंतर बैठकीला सुरुवात झाली.

- सुरुवातीला प्रत्येक जिल्ह्यातील संघटनात्मक स्थितीचा आढावा राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांच्या पुढाकाराने घेण्यात आला. सदर आढाव्यानुसार समितीच्या शाखांची संख्या ३९९ पर्यंत गेली असल्याचे आनंददायी चित्र समोर आले.
- अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या संपादकीय व व्यवस्थापन विभागातील चर्चेमध्ये अंकातील आशय, जाहिराती आणि देणगी याबद्दल सविस्तर चर्चा झाली. राज्यभरातील कार्यकर्त्यांनी अंकाचा प्रसार आणि वितरणासाठी केलेल्या परिश्रमाबाबत संपादक मंडळाने कृतज्ञता व्यक्त केली.
- समितीच्यावतीने राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा विविध उपक्रम विभागाच्या चर्चेमध्ये घेण्यात आला. 'वारसा संतांचा-अंधश्रद्धा निर्मूलनाचा' या जनप्रबोधन यात्रेचा सविस्तर वृतांत विभागाचे राज्य कार्यवाह अनिल करवीर आणि मनोहर जयभाये यांनी मांडला. कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून संतांचे अंधश्रद्धा निर्मूलनविषयक विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात ही यात्रा यशस्वी ठरली असल्याचे या मांडणीतून समजले.
- बुवाबाजी विरोधी संघर्ष विभागाच्या राज्य कार्यवाह ॲड. रंजना पगार-गवांदे यांनी सदर विभाग अधिकाधिक सक्रिय होण्याची गरज व्यक्त केली. शासन स्थापित जादूटोणाविरोधी कायदा प्रचार, प्रसार समितीत संघटनेने अधिक प्रतिनिधित्वासाठी ठोस पावले उचलण्यावर त्यांनी भर दिला.
- राज्य कार्यवाह मच्छिंद्रनाथ मुंडे व विशाल विमल यांनी प्रकाशन विभाग सक्षमपणे कार्यरत असल्याचे प्रतिपादन केले. तसेच भविष्यात कार्यकर्त्यांच्या साहित्यकृती प्रकाशित करणे आणि पुस्तक विक्री वाढवण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्नशील राहाण्याची आशा त्यांनी व्यक्त केली. ऑनलाईन पुस्तक विक्रीचा आढावा घेतला.
- समितीमध्ये युवकांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी जिल्हा युवा संवाद अभियान आणि युवा संकल्प परिषदांच्या विभागवार आयोजनावर भर द्यावा असे युवा विभागाचे सहकार्यवाह रुपेश वानखेडे यांनी सांगितले. या विभागाचे मार्गदर्शन कृष्णात कोरे यांनी पुढील नियोजनाची चर्चा केली.
- कायदा व्यवस्थापन विभागाच्या कार्यवाह ॲड. मनीषा महाजन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लॉकडाऊनमध्ये ऑनलाईन पद्धतीने विभागाचे काम उल्लेखनीय झाल्याचे सांगितले. तसेच कार्यकर्त्यांसाठी जादूटोणा व सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्याबद्दल मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्याचे काम विभाग लवकरात लवकर पूर्ण होईल, असे आश्वासन दिले.
- जातीअंत विभागातील चर्चेत मिश्र विवाह विभागाचे कार्यवाह दिलीप आरळीकर यांनी लातूर शाखेने आजअखेर ३०९ आंतरजातीय आणि सत्यशोधकी विवाह लावत या विभागामध्ये भरीव काम केल्याचे अधोरेखित केले. जोडीदाराची विवेकी निवड विभागाच्या कार्यवाह आरती नाईक यांनी संवाद कार्यशाळा, प्रशिक्षण, कार्यक्रम याबद्दल सविस्तर माहिती देत तरुणाई या विभागाकडे आकर्षित

होण्याचं प्रमाण वाढत असल्याचे आश्वासक चित्र उभा केले. ज्वलंत आणि प्रसार माध्यमामध्ये चर्चिल्या जाणाऱ्या जातपंचायत या विभागावरील चर्चेत महिलांच्या लैंगिक शोषणाच्या अनेक प्रकरणांचा उलगडा झाला. या विभागाचे काम अत्यंत जोखमीचे पण आवश्यक असल्याचे जातपंचायतींना मूठमाती अभियान विभागाचे कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी स्पष्टपणे मांडले.

- महिला सहभाग विभागाच्या राज्य कार्यवाह रूक्साना मुल्ला यांनी महिलांना चमत्कार सादरीकरणाचे तसेच कायद्याचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. कोरोनाच्या काळात या विभागाने उत्तम काम केल्याचे सहकार्यवाह सारिका डेहनकर यांनी सांगितले.
- प्रशिक्षण विभागाने ऑनलाईन प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यामधील कार्यकर्त्यांना प्रशिक्षित केले आहे. भविष्यात विविध भाषांतून उत्कृष्ट व्याख्यान देऊ शकतील, असे वक्ते घडविण्यासाठी बहुभाषिक वक्ता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यासाठी या विभागाने पुढाकार घ्यावा, असे ठरवण्यात आले.
- मानसिक आरोग्य विभागाचे राज्यकार्यवाह डॉ. प्रदीप जोशी यांनी ऑनलाइनद्वारे मानस मित्रांचे अत्यंत उपयुक्त प्रशिक्षण घेतले आहे. कोरोना काळात या विभागाने भरीव काम केले आहे.
- राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समन्वय विभागातील चर्चेत कार्यवाह डॉ. सुदेश घोडेराव आणि डॉ. सविता शेटे यांनी विभागाचा आढावा घेतला. परराज्यात चमत्कार प्रात्यक्षिके आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे; तसेच राज्याच्या सीमावर्ती जिल्ह्यातील स्थानिक कार्यकर्त्यांना कामात जोडून घेण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरवण्यात आले.
- निधी संकलन विभागाचे कार्यवाह परेश शाह आणि सहकार्यवाह सुधीर निंबाळकर यांनी निधी संकलनाचे विविध मार्ग कार्यकर्त्यांनी सुचवावेत आणि संघटना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न करावा, असे निर्धारित केले.
- डाकीण प्रथेविरुद्ध काम करणाऱ्या सुमित्रा वसावे व वसंत वळवी यांनी त्यांचे अनुभव कथन केले. हे अनुभव अंगावर शहरे आणणारे होते. एवढंच नाही तर संघटनेला या क्षेत्रामध्ये झोकून देऊन काम करण्याची गरज असल्याचे निदर्शनास आले. डाकीण विरोधी पुन्हा जोमाने काम करण्याचे ठरले.
- वेब साईट, यू ट्यूब, फेस बुक आदी माध्यमासाठी सोशल मीडिया विभागाने वेगवेगळ्या टीम कराव्यात आणि समितीची माहिती सर्वदूर जाण्यास मदतगार ठरावे अशी अपेक्षा या विषयावरील चर्चेतून पुढे आली. या विभागातील कार्यकर्त्यांना महात्मा गांधी मिशन विद्यापीठामार्फात प्रशिक्षण देण्यास इच्छुक असल्याचे प्रतिनिधींनी सांगितले.
- सांस्कृतिक अभिव्यक्ती विभागाचे सहकार्यवाह मनोहर जायभाये यांनी या विभागाच्या कामाचा आढावा घेतला. नाटक, पथनाट्य, रिंगण नाट्य, प्रबोधनाची गाणी, गवळण, भारूड, प्रवचन, कीर्तन अशा विविध माध्यमातून लोकांमध्ये मिसळावे असे ठरले. अंधश्रद्धा निर्मूलनाशी निगडित विषयांच्या मोहिमा, अभियाने वारंवार आखावीत व ती राबवावीत, असे अनेकांनी मत मांडले.
- वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प प्रमुख डॉ. ठकसेन गोराणे यांनी कोरोनाच्या काळात पहिल्या वर्षी दहा हजार आणि दुसऱ्या वर्षी आठ हजार माध्यमिक, प्राथमिक शिक्षकांना या विभागामार्फत प्रशिक्षण दिल्याचे सांगितले. जून २०२२ पासून शिक्षण विभागाशी पत्रव्यवहार करून, प्रत्येक जिल्ह्याने प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांची शिबिरे लावावीत, असेही सभेत ठरले .
- विज्ञानबोध वाहिनी विभागाचे सहकार्यवाह भास्कर सदाकळे यांनी हा उपक्रम, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यास आणि विकसित होण्यास फार मोठी मदत होते; तसेच संघटनेला आर्थिक पाठबळ सुद्धा मिळते, लवकरात लवकर विज्ञान बोध वाहिनी उपक्रम सुरू करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.
- राज्य कार्यकारिणी, कार्यकारी समिती, जिल्हा कार्यकारिणी व सर्व संघटनात्मक विभागाचे

व्हॉट्सअप ग्रुप अद्यावत करण्याचे या बैठकीत ठरले.

या तीन दिवसीय विस्तारित राज्य कार्यकारिणीच्या बैठकस्थळी विविध मान्यवरांनी भेट देवून अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याचा गौरव केला आणि अपेक्षाही व्यक्त केल्या. पत्रकार दीप्ती राऊत आणि प्रशांत पवार या ज्येष्ठ पत्रकारांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला आणि भविष्यात सतत संघटनेच्या सोबत राहाण्याबरोबरच, संघटनेच्या विविध कार्यक्रमांना यथोचित प्रसिद्धी देण्याचेही मान्य केले.

संघटनेच्या, जातपंचायतींना मूठमाती अभियान विभागाचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी लिहिलेल्या जातपंचायतींना मूठमाती या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीसह, मच्छिंद्रनाथ मुंडे यांच्या ''चमत्कार एक भुलभुलैय्या'', डॉ. सुशील मेश्राम यांचे देहदान, अवयवदान आणि आरती नाईक यांनी संपादित केलेल्या 'जोडीदाराची विवेकी निवड' या पुस्तकांचे प्रकाशनही मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम काळे आणि ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत डॉ. जयदेव डोळे यांच्या हस्ते करण्यात आले.

शनिवार, दिनांक ४ जून २०२२ रोजी महाराष्ट्र अंनिसच्या पुढील तीन वर्षाच्या कामकाजासाठी नवीन राज्य कार्यकारणीची घोषणा निवड सहमती समिती सदस्य सचिव सुशिला मुंडे व नितीन राऊत यांनी केली. कार्याध्यक्षपदी माधव बावगे, तर अध्यक्षपदी अविनाश पाटील यांची निवड झाली. कार्यकारी समितीतील प्रधानसचिव, सरचिटणीस तसेच विविध विभागाचे राज्य कार्यवाह आणि सहकार्यवाह यांचीही निवड सहमतीने झाली.

रविवार, दिनांक ५ जून, २०२२ रोजी समारोपासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. भालचंद्र कांगो यांना आमंत्रित केले होते. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या 'लक्षवेधी' आणि 'शतकवीर' पुरस्कारांचे वितरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. २० शाखा व २२ कार्यकर्त्यांना गौरविण्यात आले. नवनिर्वाचित राज्य कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा डॉ. भालचंद्र कांगो यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्ष अविनाश पाटील आणि कार्याध्यक्ष माधव बावगे यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीचे आयोजन औरंगाबाद जिल्ह्याचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक आणि काटेकोरपणे केले. विशेष म्हणजे महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे प्रमुख मा. अंकुशराव कदमसो यांचे बहुमोल सहकार्य संघटनेला लाभले. महा अंनिसच्या औरंगाबाद जिल्ह्याच्या माजी अध्यक्षा आणि सध्याच्या राज्य उपाध्यक्ष डॉ. रश्मी बोरीकर, राज्य सरचिटणीस शहाजी भोसले, जिल्हा कार्याध्यक्ष भाऊ पठाडे, प्रधानसचिव दीपक खंडागळे, डॉ. अजित खोचरे, आणि इतर कार्यकर्ते यांनी यशस्वीतेसाठी अतिशय परिश्रम घेतले, त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करून 'हम होंगे कामयाब' या गीताने बैठकीची सांगता झाली.

(लेखक महा.अंनिसचे राज्य प्रधान सचिव आहेत.)

●


**सोशल मीडिया मधील हँडल्सना भेट द्या/सबस्क्राईब करा/जॉईन व्हा...**

वेबसाईट : http://mans.org.in

फेसबुक पेज : MaharashtraNiS

इन्स्टाग्राम : @mahaanis_mans

ट्विटर : MahaANIS_MANS

YouTube चॅनल : MNS महा अंनिस

टेलिग्राम : mahaNIS



# अविनाशभाई : चळवळीचा रोडमॅप विस्तारणारा कार्यकर्ता व नेता

कॉ. हर्षदकुमार मुंगे
९८९०६३६३४३

महाविद्यालयीन जीवनापासून छात्रभारती विद्यार्थी संघटना आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामातून पुढे आलेले नेतृत्व म्हणजे अविनाशभाई तथा अविनाश पाटील! यांचा सामाजिक जीवनातील कार्यप्रवास ३७ वर्षांहून अधिक राहिला आहे. त्यातील २६ वर्षे ते पूर्णवेळ कामात आहेत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या स्थापनेच्या आधीपासून ते या चळवळीत आहेत. सुरुवातीची दोन वर्षे अमळनेर शाखा संघटक, संघटनेच्या नवीन संरचनेत तीन वर्षे जळगाव जिल्हा कार्यवाह, सहा वर्षे राज्य सहकार्यवाह, बारा वर्षे राज्य कार्यवाह, अलीकडची बारा वर्षे राज्य कार्याध्यक्ष राहिलेले अविनाशभाई आता राज्य अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. संघटक कार्यकर्ता असलेल्या अविनाशभाईंना पुढील कार्यप्रवासासाठी मनःपूर्वक सदिच्छा!

सानेगुरुजी यांची कर्मभूमी असलेल्या जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथे ५ मे, १९७० रोजी अविनाशभाई यांचा जन्म झाला. त्यांनी स्थापत्त्यशास्त्र पदविकेचे शिक्षण पूर्ण केले आहे. १९९० ते १९९६ अशी ७ वर्षे बांधकाम व्यवसाय करत असताना ते सामाजिक कामात सक्रिय होते आणि १९९६ पासून ते स्वतःचा चांगला चाललेला व्यवसाय बंद करून पूर्णवेळ महाराष्ट्र अंनिसच्या कामात आले. शालेय महाविद्यालयीन जीवनातील उत्कृष्ट क्रिकेटर, पुढे बांधकाम व्यवसायिक आणि ते सर्व सोडून देऊन पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ता हा थक्क करणारा प्रवास आहे.

अविनाशभाई हे स्थानिक पातळीपासून ते राज्य पातळीपर्यंतच्या कामाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलनामध्ये सहभागी आहेत. १९८६-८७ पासूनच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्याच्या स्थित्यंतरांचे ते साक्षीदार आहेत. पुढे स्थापनेपासून महाराष्ट्र अंनिसच्या कामात ते सक्रिय राहिले आहेत. अविनाशभाईंनी म.अंनिसच्या संघटनात्मक मजबुतीसाठी विशेष प्रयत्न केले. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या गेल्या ३२ वर्षांतील सर्वच कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. संघटक कार्यकर्ता अशी अविनाशभाई यांची ओळख राहिली आहे. म.अंनिसच्या ३२ वर्षांत आयोजित केलेल्या राज्यव्यापी प्रबोधन मोहिमा, अधिवेशने, परिषदा, चमत्कार सत्यशोधन मोहीम आणि आव्हान यात्रा, आंदोलने, मोर्चे यांसह अनेक प्रकारच्या प्रशिक्षण शिबिरांच्या आयोजन-संयोजनामध्ये नेहमीच ते पुढे राहिले आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन यांसह विविध विषयांवरील शेकडो व्याख्याने त्यांनी दिली आहेत. अनेक वृत्तपत्र आणि नियतकालिकांच्या माध्यमातून त्यांचे लेख आणि मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत. संघटना बांधणीसाठी विशेष प्रयत्न करून राज्याच्या सर्वच ३६ जिल्ह्यांतून विस्तारलेली आणि वैचारिकदृष्ट्या व्यापक भूमिका घेऊन विविध आघाड्यांवर कार्यरत असणाऱ्या संघटना उभारणीत महत्त्वपूर्ण शीर्षस्थ वाटा त्यांचा राहिला आहे. कार्याध्यक्ष म्हणून शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि अविनाशभाई यांची कार्यपद्धती काही बाबतीत भिन्न राहिली आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर असताना आणि नसताना अविनाशभाई यांनी नेतृत्व म्हणून जे काम उभे केले ते अधोरेखित करण्याची गरज आहे. नेता आणि संघटना यांच्या कामात फरक करणे योग्य नसले तरी नेता काही गोष्टींमध्ये आघाडीवर असतो आणि तो दुसऱ्या बाजूला संघटनेच्या कार्यकर्त्यांचा आवाज ओळखून संघटनेला दिशा देत असतो. या अर्थाने यांचे काम, आवाका मोठा राहिला आहे, याची नोंद घ्यावी लागेल.

२०१० साली शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर असतानाच त्याच्याकडील कार्याध्यक्ष पद अविनाशभाई यांच्याकडे आले आणि पडद्याआड असलेले नेतृत्व सर्वांसमोर आले. २० ऑगस्ट, २०१३ रोजी शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा झालेला खून हा सर्वांसाठी धक्का होता. अशावेळी महाराष्ट्र अंनिसच्या अस्तित्वाबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. इतके वर्षे प्रकाशझोतात न येता पडद्यामागे राहून संघटना बांधणी, उभारणीचे काम करणाऱ्या अविनाशभाईंच्या नेतृत्वाचा अशा वेळी कस लागणार होता. पण ते ताकदीचे संघटक कार्यकर्ता असल्याने त्यांनी

स्वतःचे नेतृत्व सिद्ध केले. संघटना बांधणी कौशल्य, दौरे, लोकशाही आणि विकेंद्रित कार्यपद्धती, भविष्यवेधी दृष्टिकोन आणि उपक्रमशीलता याने संघटना उभी राहिलीच; पण ती दुप्पट विस्तारली आहे. २०१३ पर्यंत राज्यात पावणे दोनशे शाखांच्या माध्यमातून होत असलेले काम आता साडेतीनशे शाखांच्या माध्यमातून सुरू आहे. ज्या जादूटोणाविरोधी कायद्यासाठी दाभोलकर यांनी मंत्रालयाच्या पायऱ्या झिजविल्या, संघटनेने वेळोवेळी आंदोलने केली, तो कायदा त्यांच्या खुनानंतर मंजूर करून घेण्यासाठी अविनाशभाई यांनी जनप्रक्षोभ संघटित करून कायदा मंजुरीसाठी प्रयत्न केला. तसेच, राज्य सरकारने मंजूर केलेला सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा तर अविनाशभाई यांच्या एकहाती पुढाकाराने झाला आहे. आज या दोन्ही कायद्यांच्या माध्यमातून शेकडो लोकांची शोषणातून मुक्तता झाली आहे.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाच्या तपासामध्ये संघटनेने सलग ५ वर्षे प्रत्येक महिन्याच्या २० तारखेला आंदोलन करून सरकारवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अविनाशभाई यांची भूमिका दिशादर्शक होती. खुनामुळे निर्माण झालेल्या प्रक्षोभाला विघातक रूप येऊ न देता ते विधायक रूपाने व्यक्त होण्याची दिशा दिली. तशी आंदोलने, घोषणा, उपक्रम आखले. स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी, प्रशासक ते राज्य – देशपातळीवरील महत्त्वाचे राजकीय पक्ष, सत्ताधारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना भेटून खुनाच्या तपासात त्यांना लक्ष घालण्यास भाग पाडले. विशेष म्हणजे पारंपारिक खून, हत्या या दृष्टिकोनातून दाभोलकरांच्या खुनाकडे न पाहाता पुरोगामी – प्रतिगामी संस्था संघटनांच्या संघर्षातून दाभोलकरांचा खून झाला आहे. विचारांचा प्रतिवाद विचारांनी करता येत नाही तर माणूसच मारा, या वृत्तीतून दाभोलकर यांचा खून झाला आहे, अशी अविनाशभाई यांनी भूमिका मांडली आणि त्या दिशेने तपासयंत्रणेला तपास करण्यास भाग पाडले आणि म्हणूनच आज दाभोलकर खुनाचा तपास एका टप्प्यावर आला आहे.

महाराष्ट्रासह इतर राज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील अविनाशभाई यांच्या कामाचा विस्तार राहीला आहे. कर्नाटक राज्यात अविनाशभाई आणि संघटनेच्या पाठपुराव्यातून स्थानिक पुरोगामी संस्था संघटनांच्या मागणीनुसार जादूटोणा विरोधी कायदा झाला आहे. किमान २० राज्यांमध्ये तरी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामाबद्दल चर्चा आणि काम सुरू झाले आहे. राज्यसभेचे तत्कालिन खासदार जनार्दन वाघमारे सर यांनी जादूटोणाविरोधी कायदा केंद्र सरकारने करावा यासाठी खाजगी विधेयक मांडले होते. युगांडा देशात नरबळी प्रथेविरोधात म.अंनिसच्या विशेषतः अविनाशभाई आणि सुदेश घोडेराव यांच्या संपर्कातून कायदा झाला. युनोमध्येदेखील या कायद्यासंबंधातील ठराव मंजूर करण्यात आला.

बी. प्रेमानंद यांनी स्थापन केलेल्या फेडरेशन ऑफ इंडियन रॅशनलिस्ट असोसिएशन या राष्ट्रीय संस्थांचे अविनाशभाई उपाध्यक्ष आहेत. तसेच ते विविध समविचारी सामाजिक संघटनांशी जोडले गेले आहेत. १९८५ ते १९९४ पर्यंत ते छात्रभारती विद्यार्थी संघटनेत सक्रिय होते. पुढे राष्ट्रसेवा दलातही सक्रिय झाले. आता ते सानेगुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठान (अमळनेर), सामाजिक कृतज्ञता निधी (महाराष्ट्र), मानव अधिकार कृती गट, विधी अध्ययन व संशोधन केंद्र (धुळे), व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंच या काही प्रमुख संस्थांशी जोडले गेले आहेत.

जून २०१९ मध्ये भोर (पुणे) येथे विस्तारित राज्य कार्यकारिणी झाली. यावेळी २०१९ ते २०२२ या कालावधीसाठी राज्य पदाधिकारी निवडले गेले. या पदाधिकारी सहमती निवड समितीचे अध्यक्ष एन. डी. पाटील सर (समितीचे संस्थापक अध्यक्ष) होते. सरांच्या उपस्थितीत कार्याध्यक्ष, प्रधानसचिव, सरचिटणीस, सहमती निवड समिती पदाधिकारी, संपादक मंडळ आदी निवडक पदाधिकाऱ्यांसोबत बैठक झाली. माझ्या समोरील संघटनेचा रोडमॅप मला असे सांगतो की, पुढील किमान १० वर्षे तरी संघटनेच्या नेतृत्वासाठी अविनाश शिवाय मला दुसरा समर्थ पर्याय दिसत नाही, असे उद्गार एन.डी.सरांनी सदर बैठकीमध्ये काढले होते. एक प्रकारे सरांनी अविनाशभाई यांच्या कामाची दिलेली ती पावती होती आणि पुढील कामासाठीची सदिच्छाही होती. आजच्या टप्प्यावर चित्र बदलले आहे. एन. डी. सर आपल्यात नाहीत. एन. डी. सरांच्या जागेवर अविनाशभाई अध्यक्ष झाले आहेत. सरांच्या मनातील संघटनेचा रोडमॅप अविनाशभाई समर्थपणे विस्तारत नेतील, यात तीळमात्र शंका नाही.

(लेखक, थॉट विथ ॲक्शन जर्नलचे संपादक आहेत.)

●



# माधव बावगे : साहसी आणि ध्येयनिष्ठ कार्यकर्ता

डॉ. सोमनाथ रोडे
७५१७९८५६९०

माधव बावगे यांची नुकतीच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याध्यक्षपदावर निवड झाल्याचे समजल्यामुळे मला खूप आनंद वाटला. माधव बावगे यांना मी गेल्या पन्नास वर्षांपासून जवळून पाहिले आणि अनुभवले आहे. ते माझे प्रत्यक्ष जरी विद्यार्थी नसले, तरी अप्रत्यक्षरीत्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आणि श्रमर्षी बाबा आमटेद्वारा आयोजित श्रमसंस्कार शिबिराच्या आयोजनातून त्यांचा आणि माझा सतत निकटचा संबंध राहिला आहे. एक अतिशय सालस, श्रमनिष्ठ, ध्येयनिष्ठ नी चिकाटीचा युवक कार्यकर्ता म्हणून ज्या निवडक युवक कार्यकर्त्यांनी माझे लक्ष वेधून घेतले, त्यात माधव बावगे यांचा क्रम लागतो. विद्यार्थि दशेपासून कमवा व शिका योजनेतून त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. एम. कॉम.चे शिक्षण चालू असतानाच लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात टायपिस्टची नोकरी लागली. घरची गरिबी व घरात थोरला मुलगा असल्यामुळे नोकरीशिवाय अन्य पर्याय नव्हता. कौटुंबिक जबाबदारी आणि नवीन कॉलेजमधील प्रारंभिक कामाचे ओझे इत्यादीमुळे ते एम. कॉम.चे शिक्षण अखेरपर्यंत पूर्ण करू शकले नाहीत, याची खंत वाटते.

डॉ. जे. एम. वाघमारे, प्राचार्य अनिरुद्ध जाधव, प्राचार्य आर. एल. कावळे यांना बावगेंच्या आर्थिक परिस्थितीची आणि त्यांच्यातील प्रामाणिक स्वभावाची जाण होती. त्यामुळेच महाविद्यालयात ते कारकून पदापासून ते रजिस्ट्रारपर्यंतचा हा सन्मान व विद्यार्थ्यांचे अतूट नाते प्राप्त करू शकले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातूनच ते श्रद्धेय बाबा आमटेद्वारा आयोजित श्रमसंस्कार शिबिराशी जोडले गेले. १९७५ पासून आजपर्यंत श्रमसंस्कार शिबिराशी यांचे अतूट नाते राहिले. मध्यंतरी सुमारे आठ वर्षे त्यांचे सोमनाथ येथील श्रमसंस्कार शिबिराचे संयोजकपदही कुशलतेने सांभाळले. त्यातूनच बाबा आमटेद्वारा आयोजित दुसऱ्या 'भारत जोडो' अभियानात ते सायकलयात्री म्हणून सहभागी झाले. अरुणाचल प्रदेशातील इटानगर ते ओखा (गुजरात) पर्यंतचा ६५०० कि.मी.चा सायकल प्रवास जवळपास साडे पाच महिन्यांचा होता. माधव बावगे यांचे आव्हानावर तुटून पडणारे धाडसी मन त्यामुळे अधिक साहसी बनले. तरुणांचे आयडॉल असलेल्या डॉ. एस. एन. सुब्बाराव यांच्या 'राष्ट्रीय एकात्मता' युवक शिबिरातील सहभागामुळे त्यांचे साहसी मन ध्येयनिष्ठ, समाजनिष्ठ नी राष्ट्रनिष्ठ बनले.

डॉ. ना. य. डोळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'छात्र भारती' युवा संघटनेत त्यांनी समर्पित भावनेने ग्रामीण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समस्यांना वाचा फोडली. तेव्हाच डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीकडे ते आकृष्ट झाले. विवेकनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीशी ते गेल्या तीस वर्षांपासून जोडलेले आहेत. अलीकडे तर अंधश्रद्धा निर्मूलन समिती म्हणजे माधव बावगे आणि माधव बावगे म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन असे जणू समीकरणच झाले आहे. या चळवळीत सामान्य कार्यकर्त्यांपासून जिल्हाध्यक्ष, जिल्हा चिटणीस ते प्रधानसचिव आणि कार्याध्यक्षपर्यंतची उत्तुंग झेप त्यांनी स्वकर्तृत्वाच्या बळावर घेतली आहे. मराठवाड्यात नी महाराष्ट्रात शेकडो भोंदू साधूंच्या भानगडी त्यांनी चव्हाट्यावर आणल्या. भानामती, चेटकीसारखे प्रकार हे मानसिक आजाराचे प्रकार असल्याचे त्यांनी सिद्ध करून दाखविले. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या सर्व कसोट्यांवर उतरलेला एक कसदार, नि:स्वार्थी, नि:र्लोभी, प्रसिद्धी पराङ्मुख असा विवेकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीमध्ये बावगे यांचे स्थान आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर, अविनाश पाटील यांच्यानंतर कार्याध्यक्षपदाची धुरा तितक्याच समर्पितवृत्तीने व समर्थपणे माधव बावगे सांभाळतील, असा मला विश्वास वाटतो. युक्ती आणि

कृतीमध्ये साधर्म्य ठेवणारे जे मोजके निष्ठावंत कार्यकर्ते मी पाहिले, त्यात माधव बावगे यांचे स्थान ध्रुवताऱ्यासारखे अढळ आहे.

राष्ट्रीय युवा पुरस्काराचे मानकरी, सामाजिक कृतज्ञता पुरस्काराचे सन्मानकर्ते, महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्काराचे विजेते आणि महाराष्ट्रातील बहुविध सामाजिक चळवळींच्या पुरस्काराचे मानबिंदू राहिलेले माधव बावगे आज अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याध्यक्षपदावर आरूढ झाल्यानंतर महाराष्ट्रातील अंनिसच्या प्रत्येक कार्यकर्त्यास जणू आपणच 'कार्याध्यक्ष' आहोत, असे अप्रुपपणे वाटते. कारण तळागाळातील सर्व छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांशी, त्यांच्या सुख-दु:खाशी ज्या जवळीकतेच्या आणि जिव्हाळ्याच्या नात्याने माधव बावगे संबंध ठेवतात, त्यातच परस्परांचे स्नेहबंध जुळलेले आहेत. महाराष्ट्रात कधी नव्हे एवढी आज अंनिसच्या विचारांचा जागर सर्वत्र होण्याची गरज आहे. पुरोगामी महाराष्ट्राचा हा समृद्ध आणि संपन्न वारसा जतन करण्यासाठी आणि अंनिसच्या प्रत्येक कार्यकर्त्याला डोळ्यात तेल घालून जागल्याची भूमिका चोखपणे पार पाडावी लागेल. अंनिसच्या तमाम कार्यकर्त्यांना आजचे आव्हान पेलण्यासाठी नैतिक बळ आणि प्रेरणा देण्याचे स्फूर्तिदायी कार्य नव्या कार्याध्यक्षाच्या नेतृत्वाखाली पूर्णत्वाला जावो, हीच सदिच्छा!

(लेखक प्रसिद्ध वक्ते व अंनिसचे मार्गदर्शक आहेत.)

●

---

**(पृष्ठ क्र. ९ वरुन)**

न्यायालयं, केंद्रीय संस्था, विविध आयोग, पोलीस- सगळ्या संस्थांचं हे झालेलं आहे. लोकशाहीतल्या उदारमतवादाला नष्ट केलं गेलं आहे. कल्याणकारी राज्याची व्यवस्था संपवली गेली आहे.

प्रत्येकाकडे मोबाईल फोन आला आहे, तेव्हा तंत्रज्ञान घरोघरी पोहचलं आहे, असं आपल्याला वाटतं. पण त्याच साधनांनी व्यवस्था, बाजार आणि कंपन्या तुमच्या प्रत्येक कृतीवर पाळतही ठेवू शकतात, हेही सत्य आहे. तंत्रज्ञानासोबतच विषमता, अस्थिरता आणि असुरक्षितताही निर्माण होते. असुरक्षिततेचा फायदा मूलतत्त्ववाद्यांना होतो. कारण मग 'आपण' आणि 'ते' अशी उभी विभागणी करता येते. माहिती, माहितीवरची मक्तेदारी जशी संपते, त्याचप्रमाणे माहितीला तर्क आणि तथ्याचा पाया असेलच अशी शाश्वती देता येत नाही.

असहमती दर्शवली किंवा अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूनं बोललं तर तुम्ही देशद्रोही असा दंडेलशाहीतला संदेश तिन्ही त्रिकाळ ऐकून लोक भयभीत झाले आहेत. विरोधातल्या कोणत्याही मुद्याला राष्ट्रभक्ती आणि देशाच्या सुरक्षेशी जोडलं जात आहे. शेतकरी मरताहेत, लोक रांगांमध्ये मरताहेत, महागाईनं हैराण होताहेत- सगळ्यांवर एकच उत्तर दिलं जातं. देशासाठी, देशभक्तीसाठी एवढं कराच. प्रत्येक गोष्टीचा असा राष्ट्रवादाशी बादरायण संबंध जोडला की, सगळ्या अत्याचारांवर पांघरूण घालता येतं.

एक मोठा वर्ग आहे जो दिसत नाही. जो बहुसंख्य आहे आणि त्याची मतं विचारली जात नाहीत आणि ती माध्यमांपर्यंत पोहोचतही नाहीत. तो शहरी झगमगाटापासून दूर आहे. पण तो प्रत्यक्ष या बदललेल्या झगमगाटी खोट्या 'विकासा'ची झळ पोहोचलेला आहे. तो प्रत्यक्ष पीडित आहे. त्याच्या घरात आत्महत्या झालेल्या आहेत. मुलांना रोजगार नाहीत. त्याच्या गावात वीज, रस्ते नाहीत. त्याच्या जमिनी भांडवलदारांच्या खाणींसाठी, उद्योगांसाठी गिळल्या जात आहेत. बँकेसाठी त्याला तालुक्याच्या गावी जावं लागतंय आणि तिथं पोहोचूनही त्याच्या हातात काहीच पडत नाही. बेगडी घोषणांना-जुमलेबाजीला तो ओळखू लागला आहे.

क्रमश:

(लेखक प्रसिद्ध कवी, चित्रकार, अनुवादक आहेत.)
उदगीर येथील १६ व्या विद्रोही साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण

●

# महाराष्ट्र अंनिसची खबरबात





अनिल शोभना वसंत
९८२३२८०३२७

## अंधश्रद्धा निर्मूलन संवाद शिबिर

**पनवेल :** दि. ८ मे २०२२ रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, मोहो पाडा आणि पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने अंधश्रद्धा निर्मूलन संवाद शिबिर रीस (रसायनी) येथे आयोजित करण्यात आले होते. शिबिरात अंनिसची वैचारिक भूमिका, चमत्कारामागील विज्ञान, कायद्यांची ओळख, भूत–भानामती, मानसिक आरोग्य, फलज्योतिष इत्यादी विषयांवर संवाद करण्यात आला. जिल्हा परिषद सदस्या उमाताई यांनी शिबिराचे उद्‌घाटन केले.

पनवेल, राष्ट्रसेवा दल, ग्रामस्वराज्य समिती महा. अंनिस कार्यकर्त्यांनी शनि. दि. २८ मे २०२२ रोजी सनातन संस्थेच्या असंविधानिक आवाहनावर आक्षेप नोंदवला. संविधान–विरोधी कार्यक्रमासाठी परवानगी न देता संविधानिक मूल्यांचा अवलंब करावा असे निवेदन पनवेलचे सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे यांना कार्यकर्त्यांनी दिले. सदर घटनेची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आदेश सहाय्यक आयुक्तांनी शहर पोलिसांना दिल्याचे सांगितले. यावेळी अजय पाटील, तेजल खेडेकर, कुमार भंडारी, नाजुका सावंत व पुरुषभान संवाद मंचाचे महेंद्र नाईक, अल्लाउद्दीन शेख आदी उपस्थित होते.

## जादूटोणाविरोधी आणि सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा प्रशिक्षण.



**लातूर :** दि. १ ते २५ मे २०२२ दरम्यान लातूर जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये जादूटोणाविरोधी आणि सामाजिक बहिष्कारविरोधी कायद्याचे प्रशिक्षण देण्यात आले. पोलीस स्टेशन अंतर्गत येणारे सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स यांना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले. राज्य प्रधानसचिव माधव बावगे, रूक्साना मुल्ला, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर, जिल्हा प्रधानसचिव बाबा हलकुडे, जिल्हा प्रधानसचिव सुधीर भोसले, सचिन औरंगे, जिल्हा उपाध्यक्षा सुनीता तयारीकर इत्यादींचा यामध्ये सहभाग होता.

## मन आणि मनाचे आजार– ऑनलाईन व्याख्यान

**जालना :** महा.अंनिस (मानसिक आरोग्य विभाग) आणि संवाद समुपदेशन केंद्र, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ मे २०२२ रोजी ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ‘मन आणि मनाचे आजार : वास्तव आणि गैरसमजुती’ या विषयावर मा. तुषार चोपडे, कोल्हापूर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वैशालीताई सरदार (जिल्हाध्यक्ष), राजू खिल्लारे (जिल्हा कार्याध्यक्ष), किशोर आघाम आदींनी परिश्रम घेतले.

## ऑनलाईन संवाद

वर्धा : समितीच्या वर्धा शाखेतर्फे शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर स्मृतिप्रित्यर्थ अंबरनाथ शाखेचे कार्यकर्ते अमोल चौगुले यांचे ‘भारतीय तरुण, राजकारण आणि सद्यस्थिती’ या विषयावर दि. ३० मे २०२२ रोजी ऑनलाईन संवादाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमित कुंभलकर तर प्रास्ताविक डॉ. माधुरी झाडे यांनी केले. वक्त्यांचा परिचय सारिका डेहनकर तर आभार प्रितेश म्हैसकर यांनी मानले.

## पुणे येथे कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यशाळा

**पुणे :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाची पंचसूत्री, खगोलशास्त्र आणि विज्ञान, चमत्कार सादरीकरण, जोडीदाराची विवेकी निवड या विषयावर महाराष्ट्र अंनिसच्या आकुर्डी (पुणे) शाखेने १५ मे २०२२ रोजी कार्यकर्ता कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेला ४५ कार्यकर्ते उपस्थित होते. नेटकं संयोजन, दर्जेदार मांडणी यामुळे कार्यशाळा उत्साही आणि प्रेरणादायी झाली. चिंचवड येथील अपंग रोजगार उद्योग व तांत्रिक प्रशिक्षण केंद्र (हँडीकॅप सेंटर, पुणे) येथे ही कार्यशाळा संपन्न झाली.

महाराष्ट्र अंनिसचे प्रधानसचिव संजय बनसोडे, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे संपादक डॉ. नितीन शिंदे, महाराष्ट्र अंनिस जळगाव जिल्हा कार्याध्यक्ष दिगंबर कट्यारे, महाराष्ट्र अंनिसच्या विधी व्यवस्थापन विभागाच्या कार्यवाह ॲड. मनिषा महाजन, आकुर्डी शाखेच्या कार्याध्यक्ष क्रांती दांडेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी सुनील चोरडिया, पुणे जिल्हा कार्याध्यक्ष संजय बारी, आकुर्डी शाखा सचिव स्वप्नील वाळुंज, निधी व्यवस्थापन विभागाचे कार्यवाह एकनाथ पाठक आदी उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी गंगाधर सत्वधर, विकास सूर्यवंशी, संजय बनसोडे, बाळासाहेब घस्ते, विशाल विमल, रविराज थोरात, श्रावणी वाळुंज, राजकुमार माळी, नितीन खलाने, डॉ. योगेश गाडेकर, सुनील चोरडिया व हँडीकॅप सेंटर, पुणे यांनी सहकार्य केले.

## कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

**नाशिक:** अंनिसच्या नाशिक शाखेतर्फे युवा वर्गासाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. समीर शिंदे यांनी महाराष्ट्र अंनिसची व्यापक भूमिका मांडली तर महेंद्र दातरंगे यांनी मानसिक आजार आणि उपाय याचे विवेचन केले. डॉ.गोराणे यांनी चमत्कार सादरीकरण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयाची सविस्तर मांडणी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार जिल्हा प्रधानसचिव नितीन बागुल यांनी केले.

## सामाजिक सलोख्यासाठी ईद-मिलन

**औरंगाबाद :** महा.अंनिस आणि शमा एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक सलोखा राखण्याच्या उद्देशाने ईद मिलन कार्यक्रम संपन्न झाला. रमजान ईदनिमित्त बंधुभाव व सर्वधर्मसमभाव यावर ठाम विश्वास असणाऱ्या औरंगाबाद शहरातील विविध जाती-धर्माच्या व संस्था संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसाठी हा कार्यक्रम घेण्यात आला होता. यावेळी सामाजिक चळवळीतील ८० कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी तृतीयपंथी व ट्रान्सजेन्डर संघटनांच्या प्रतिनिधींनादेखील निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी डॉ. अजिज कादरी, डॉ.रश्मी बोरीकर, कॉ. राम बाहेती, मंगला खिवंसरा, सय्यद शुतारी, मौलाना अब्दुल आजिम, लोकेश कांबळे, अंजुम कादरी, प्रा. डॉ. आनंद देशमुख, श्रीराम जाधव, अण्णा खंदारे आदींचा सहभाग होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहाजी भोसले यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. अजित खोजरे यांनी केले. जिल्हा कार्याध्यक्ष भाऊसाहेब पठाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वासुदेव देशपांडे, अमोल वाकळे, मुजम्मिल पटेल, डॉ.सय्यद जफर, शेख नजिर, मेराज कादरी आदींनी परिश्रम घेतले होते.

## उन्हाळी शिबिरामध्ये प्रबोधन



**बदलापूर:** रत्नबोधी विहार, विक्रोळी येथे उन्हाळी शिबिरामध्ये व्यसनमुक्ती आणि चमत्कारामागचे विज्ञान या विषयावर महाराष्ट्र अंनिसच्या बदलापूर शाखेच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रम सादर केला. व्यसनांविषयी प्रियांका सवाखंडे यांनी मुलांशी संवादी पद्धतीने माहिती दिली, तर चमत्काराविषयी शाखेचे कार्याध्यक्ष चाळकेसर, घाटकोपर शाखेचे शहाजी, विनया, संदेश बालगुडे यांनी नारळातून विविध वस्तू काढणे, पाण्याने दिवा पेटवणे आदी प्रयोग करत मुलांची उत्सुकता चाळवली. अखंड केळ्याला अदृश्यपणे तुकडे करण्याचा प्रयोग मुलांकडून करून घेत रिकाम्या तांब्यातून वेगवेगळ्या नद्यांचे पाणीही आणले. हा अनुभव कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारा होता.

रविवार, दि. ५जून २०२२ रोजी जागतिक पर्यावरणदिनाच्या निमित्ताने राजमाता जिजाऊसाहेब यांची समाधी (पाचाड, रायगड) परिसरात रीतसर परवानगी घेऊन उंबर वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले. अनिल शेवंती कृष्णा चाळके यांनी स्वतःच्या घरी कुंडीमध्ये उंबर वृक्ष वाढवलेला होता.

## विविध उपक्रमांचे आयोजन

**नागपूर :** दि. ११ मे २०२२ रोजी महा. अंनिस, नागपूर जिल्हा बैठक घेऊन कार्यकर्त्यांनी राज्य कार्यकारिणीकरिता स्वेच्छा व शिफारस फार्म भरून सहभाग नोंदवला. बैठकीला १८ कार्यकर्ते उपस्थित होते.

दि. १५ मे २०२२ रोजी स्थानिक वर्तमानपत्रांमधून वारसा संतांचा अभियानामध्ये जनतेने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते.

दि. २० मे २०२२ रोजी सतरंजीपुरा येथे आदिम संशोधन मंडळाच्या व्यक्तित्व विकास शिबिरामध्ये जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी चमत्कार सादरीकरण व प्रबोधन केले. यावेळी रवी सहारे, मंजुश्री फोपरे, चैताली रामटेके उपस्थित होते. यामध्ये १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

दि. २१ मे २०२२ रोजी आदिम संशोधन मंडळाच्या व्यसनमुक्त प्रभातफेरीमध्ये जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी व्यसनमुक्तीच्या पोस्टर, बॅनरसह सहभाग नोंदवून सर्वांना व्यसनमुक्तीचा संकल्प दिला.

दि. २२ मे २०२२ रोजी कोराडी शाखा बैठक संपन्न झाली. जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त व्यसनमुक्त मार्निंग वॉकचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दि. २४ मे २०२२ रोजी कोराडी शाखेतर्फे महादुला टी पॉईंट येथे पुस्तक विक्री व सभासद नोंदणी स्टॉल लावण्यात आला होता. यावेळी बबन गायकवाड, विलास भालेराव, ताराचंद पखिड्डे यांनी सहभाग नोंदविला.

२५ मे २०२२ रोजी प्रज्ञा बहुउद्देशीय संस्थेच्या उन्हाळी शिबिरामध्ये जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी चमत्कार सादरीकरण केले. यावेळी २० विद्यार्थी–विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

दि. ३१ मे २०२२ रोजी कोराडी येथे सकाळी व्यसनमुक्त मॉर्निंग वॉकचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी घोषणा देऊन मजूर वसाहतीमधून प्रभातफेरी काढण्यात आली. या प्रभातफेरीमध्ये पी.के. सिन्हा, निशा जगणीत, बबन गायकवाड बाळकृष्ण झाडोकार, विलास भालेराव, अनिता पाटील, गुलाब साबळे, रत्नदीप रंगारी, ताराचंद पखिड्डे, दयानंद कांबळे यांचेसह श्रीकांत टिटोरियलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी व्यसन सोडलेल्या बगाटे परिवाराचा पुस्तक भेट देऊन सन्मान करण्यात आला.

## जटा निर्मूलन

**कोल्हापूर :** कोल्हापूर शाखेच्या कार्यकर्त्यांनी कोल्हापूर येथील युवतीचे जटा निर्मूलन केले. कोल्हापूर येथे आपल्या वृद्ध वडिलांसोबत राहाणाऱ्या ३४ वर्षीय युवतीच्या केसांत गेल्या काही वर्षांपासून जटा वाढलेल्या होत्या. वाढलेल्या जटांमुळे युवतीच्या आरोग्यावर परिणाम होत होता. याविषयी सदर युवतीच्या वडिलांनी समितीचे राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती यांच्याशी संपर्क केला आणि जटा निर्मूलन करण्याचे आवाहन केले. त्यानुसार कृष्णात स्वाती आणि शहर कार्याध्यक्ष स्वाती कृष्णात यांनी कुटुंबीयांचे प्रबोधन करत जटांचे ओझे काढून टाकले. जटा काढल्यावर संबंधित युवती आणि तिच्या वडिलांनी आनंद व्यक्त केला आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामाला सदिच्छा दिल्या.

## प्रबोधन कार्यक्रम

**ठाणे :** दि. १५ मे रोजी तारापूर येथे ठाणे जिल्ह्याच्या वतीने युवा शिबिर घेण्यात आले. राज्य कार्यवाह अनिल शोभना वसंत यांनी चमत्कार सादरीकरण व गीते सादर केली. राज्य युवाण सहकार्यवाह अमोल चौगुले यांनी 'प्रेमात पडताना' या विषयावर तर परेश काठे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर संवाद साधला. चांगल्या वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. दि. १६ मे २०२२ रोजी बौद्ध पौर्णिमेनिमित्त कल्याण शाखेतर्फे अंनिपचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांनी 'बौद्ध धर्मामध्ये स्त्रियांचे स्थान काल आज आणि उद्या' या विषयावर व्याख्यान दिले. कल्याण शाखेच्या अध्यक्षा डॉ. सुषमा बसवंत यांनी 'गौतम बुद्ध आणि त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर व्याख्यान दिले.

## एक अनोखा विवाह सोहळा !

**धुळे:** काशी कापडी समाजातील अशोक कापसे यांची विधवा मुलगी कल्याणी व सटाणा येथील अंकुश वाटेकर यांचा घटस्फोटीत मुलगा सुनिल यांचा विवाह अंनिसच्या पुढाकाराने धुळे येथे संपन्न झाला. समृद्धी व साई या लहान मुलांचा सांभाळ होणार आहे. अखिल भारतीय काशी कापडी समाजाच्या महिला उपाध्यक्षा कोमल वरदे, अंनिसचे अध्यक्ष अविनाश पाटील, ॲड.विनोद बोरसे, काशी कापडी समाज पंचमंडळ अध्यक्ष पैलवान संजय वाडेकर यांनी पंचमंडळींशी समाधान–कारक चर्चा करून हा विवाह घडवून आणला. डॉ. सुरेश बिऱ्हाडे, नितीन बागुल, नवल ठाकरे यांच्यासह माजी महापौर प्रदीप कर्पे, नगरसेविका मंगला चौधरी, उपाध्यक्ष दिनकर कापसे, रविंद्र कापसे, गणेश सुधारकर उपस्थित होते.

# अंधश्रद्धा निर्मूलन समिती

## विस्तारित राज्य कार्यकारणी बैठक : औरंगाबाद : क्षणचित्रे






औरंगाबाद येथे विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीला राज्यभरातून राज्य पदाधिकारी व जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते



पुस्तक प्रकाशन समारंभप्रसंगी राज्य अध्यक्ष भाई अविनाश पाटील. यावेळी जेष्ठ पत्रकार जयदेव डोळे, मा.आमदार विक्रम काळे, डॉ.रश्मी बोरीकर, माधव बावगे, कृष्णा चांदगुडे, आरती नाईक, सुशील मेश्राम, मच्छिंद्रनाथ मुंडे उपस्थित होते



पुस्तक प्रकाशन समारंभ प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार मा.जयदेव डोळे यांची सदिच्छा भेट. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला




लातूर शिक्षक मतदार संघातील मा. आमदार विक्रम काळे यांची सदिच्छा भेट. यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले




पुस्तक प्रकाशन समारोप प्रसंगी अध्यक्षस्थानी भाई अविनाश पाटील. यावेळी जेष्ठ पत्रकार जयदेव डोळे, मा. आमदार विक्रम काळे, डॉ. रश्मी बोरीकर, कृष्णा चांदगुडे, आरती नाईक, सुशील मेश्राम, मच्छिंद्रनाथ मुंडे उपस्थित होते



भारतीय कम्युनिष्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव कॉ. भालचंद्र कांगो हे पुरस्कार सोहळा प्रसंगी उपस्थित होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला



पुस्तक प्रकाशन प्रसंगी बोलताना राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे




अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका जून २०२२ मासिकाचे प्रकाशन महाराष्ट्र अंनिसच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले यावेळी संजय बनसोडे, नितीन शिंदे, प्रल्हाद मिस्त्री, नंदकिशोर तळाशिलकर, माधव बावगे, सुशिला मुंडे, गजेंद्र सुरकार, उत्तम जोगदंड, राजेंद्र फेगडे, अजय भालकर, गोविंद पाटील, तुकाराम शिंदे, विशाल विमल, उपस्थित होते.




विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीला पत्रकार प्रशांत पवार यांनी सदिच्छा भेट दिली आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला




विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीला पत्रकार दीप्ती राऊत यांनी सदिच्छा भेट दिली आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला




प्रबोधनपर गीते सादर करताना महा. अंनिसचे कार्यकर्ते अनिल करवीर, सचिन गोवळकर, संजय शेंडे, प्रियांका खेडेकर, नाजुका, स्वाती, प्रसाद, इ.




विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीचे संयोजन महा. अंनिसच्या औरंगाबाद शाखेने केले. त्या सर्व कार्यकर्त्यांचा कॉ. भालचंद्र कांगो व राज्य पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

**Printed Book Post**

**प्रेषक,**

**प्रति,** ____________________

संपादक
**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
प्रा. डॉ. नितीन शिंदे
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली - ४१५४०९.

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.